
मैत्री सागरदुर्गांची

प्र. के. घाणेकर



महाराष्ट्राच्या भूगोलाला इतिहास प्राप्त करून देणाऱ्या किल्ल्यांवर केव्हा? कसे? अन् कशासाठी जावे? याचे उत्तर या पुस्तकात मिळेल. किल्ल्यांवर जाण्याआधी पुरेशी माहिती जमवून गेले असले तर दुर्गदर्शन अधिक नेटकेपणाने घडते. हा इतिहास जिवंत केला आहे, शेकडो किल्ले पायी हिंडून पाहिलेल्या प्र. के. घाणेकर यांनी. या पुस्तकांच्या समवेत तो तो किल्ला प्रत्यक्ष हिंडून पाहिला की आपल्या भ्रमंतीला एक निश्चित दिशा मिळेल. 'साद सह्याद्रिची - भटकंती किल्ल्यांची' ह्या नव्या स्वरूपात तुम्हाला निश्चित आवडेल.

प्रकाशक

स्नेहल प्रकाशन

स्नेहलशी स्नेह अर्थात दर्जेदार वाङ्मयाशी स्नेह.

मैत्री सागरदुर्गांची

प्र. के. घाणेकर

— प्रकाशक —

स्नेहल प्रकाशन

स्नेहलशी स्नेह
अर्थात दर्जेदार
वाङ्मयाशी स्नेह.

स्नेहल - १०८

प्रकाशिका-मुद्रक
सौ. अंजली रवीन्द्र घाटपांडे
स्नेहल प्रकाशन
३६ ब, गुरूदत्त सहवास, दक्षिणामुखी मारूतीजवळ,
४७०/४९८ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.
फोन : ४५ २९ ११.

मुखपृष्ठ पारदर्शिका
प्र. के. घाणेकर

मुखपृष्ठ सजावट
श्री. अनिल उपळेकर

प्रथम आवृत्ती - ऑगस्ट १९९३.

मुद्रणालय
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
१०१९, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०.

टाईपसेटिंग
प्रकाश एन्टरप्रायझेज
५/१५, 'अर्चना' बिल्डींग,
हॉटले स्वीकारजवळ, एरंडवणा,
पुणे ४११ ०३०.
फोन : ४३ ८३ ७३.

मनोगत

किल्ले म्हणजे महाराष्ट्राचे वैभव. भुईकोट, डोंगरी किल्ले, पाणकोट आदिंच्या जिवावर श्रीशिवछत्रपतींनी इथे देशी हिंदवी स्वराज्य उभारले. अलिकडेच 'ट्रेकिंग'च्या छंदामुळे अनेकजण या गटकोट किल्ले अन् दुर्गांवर जातात. पण तिथे कसे जावे? काय पहावे? हे सारे माहिती नसते. त्यामुळे या किल्ल्यांच्या सहलींमधून दमण्याखेरीज फारसे काही हाती लागत नाही.

मागे मी 'साद सह्याद्रीची, भटकंती किल्ल्यांची' असं सुमारे शंभर किल्ल्यांची माहिती देणारे पुस्तक लिहिले. त्याच्या दोन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. आता तर त्याचे इंग्लिश भाषांतरही प्रसिद्ध होत आहे. पण त्या पुस्तकाची किंमत आणि आकार विचारात घेतला, तर ट्रेकवर ते बरोबर वागवणे शक्य होत नाही. म्हणूनच त्याचे सोयीस्कर असे सहा भाग पाडून ते प्रसिद्ध करावेत अशी मागणी अनेक वाचकांनी अन् दुर्गप्रेमींनी केली. त्याचाच परिपाक म्हणजे हा सहा पुस्तकांचा संच. किंमत अन् आकारमान लक्षात घेतलं तर ही पुस्तकं ट्रेकवर जाताना- गड किल्ल्यांना प्रत्यक्ष भेट देताना बरोबर नेणे अन् वागवणे सोयीचे ठरावे.

दुर्गप्रेमी वाचक त्यांचे स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

– प्र. के. घाणेकर.
१०५, नारायण पेठ,
पुणे – ४११ ०३०.

अनुक्रमणिका

१. किल्ले आग्वाद. : (गोवा) •

पोर्तुगीजांचं बस्तान गोव्यात व्यवस्थित बसलं होतं. मोगलाई, निजामशाही अन् आदिलशाहीचे ते सख्खे शेजारी बनले होते. पण एके दिवशी अचानक डचांची सात गलबते पणजीसमोर ऐन समुद्रात उभी ठाकली. मांडवीच्या मुखातून पश्चिम सागरात जाणारी गलबतं अडवणं आणि जमलीच तर लुटणं एवढचं काम या वलंदेजांच्या गलबतांनी केलं, म्हणून बरं. पोर्तुगीजांना त्यातला धोका उमगला. रेईश मागुश अन् गास्पर दियश या किल्ल्यांवर फार भिस्त ठेवून परवडणार नाही हेही त्यांच्या ध्यानी आलं. अन् मग १६०४ मध्ये एक नवा जलदुर्ग जन्माला येऊ घातला. मुख्य तटबंदी १६०५ मध्ये पूर्ण झाली. अन् किल्ल्याचे बांधकाम पूर्ण व्हायला १६१२ साल उजाडले. तशा अर्थाचा मुळी तिथं शिलालेखच आहे -

'परम धार्मिक राजा फिलीप दुसरा, पोर्तुगालमध्ये राज्य करीत असताना, त्याने फर्मावल्यावरून, येथे आश्रयास येणाऱ्या गलबतांना संरक्षण आणि मदत मिळण्यासाठी हा किल्ला इ.स. १६१२ मध्ये तयार झाला. त्यावेळी रूब द ताव्होरा हे व्हाईसरॉय होते.'

अशा अर्थाचा पोर्तुगीज भाषेतला हा शिलालेख आहे.

या किल्ल्याचं बारसं झालं तेव्हा त्याचं नाव ठेवलं गेलं, 'सांत कातारीन' ! पणजीच्या पुढ्यात अन् मांडवीच्या मुखात सांत कातारीनचा संसार सुरू झाला. जमिनीवरून होणाऱ्या माऱ्यापेक्षा सामुद्रिक आक्रमणाचं भय पोर्तुगीजांना जास्त वाटे. त्या बाजूला दोन बलदंड बुरूज उभारलेले आहेत. एकाचं नाव गालव्हांव बुरूज अन् दुसरा आहे लिआंरिश बुरूज. त्यांच्यावर अनुक्रमे सात व दहा तोफा सतत माऱ्याच्या पावित्र्यात ठेवलेल्या असत.

याशिवाय तटबंदी अन् बुरूजांनी युक्त अन् खंदकानं परिवेष्टित

असा बालेकिल्ला ऊर्फ फोर्तालेझ रियाल किंवा रियल फोर्ट आहे. येथेही माऱ्याच्या सहा जागा योजल्या आहेत की आतल्या शिबंदीला पूर्ण संरक्षण मिळावं. जवळजवळ दोनशे सुसज्ज तोफांचा सरंजाम इथं सदा सिद्ध होता.

या किल्ल्याचे चौकोनी बांधणीचे अन् किंचित ढाळ दिलेले उंचच उंच बुरूज, भोवती खंदक, तटाच्या भिंतीवर गस्त घालण्यासाठी घोड्यांनाही जाता यावे म्हणून मुद्दाम तयार केलेले उतार ही पोर्तुगीज वैशिष्ट्ये इथे खूपच उत्तम तऱ्हेने साकारलेली आढळतात. पण या किल्ल्याचं खरं वैभव म्हणजे इथलं तळघर. तीन ओळीतल्या पंधरा खांबांवर छत तोललेले तळघर म्हणजे एक खरोखर प्रेक्षणीय वास्तू आहे. पोर्तुगीज राजवटीत या तळघराचा धसका प्रचंड होता. या वास्तूनं काय काय पाहिलं आहे, कोण जाणे !

तर अशा या प्रतापी किल्ल्याने गोमंतकाचं पारतंत्र्य अबाधित राखले. आदिलशाहीचा मातब्बर सरदार अब्दुल हकीम याचा पराक्रम इथं अपुरा पडला डचांना दूर राखण्यास याच किल्ल्याचा दबदबा कामी आला. १६६६ मधील शिवरायांची स्वारी अन् नंतरची शंभू छत्रपतींची मोहीम अग्वादच्या आश्रयाने राहिलेल्या पोर्तुगीजांनी हाणून पाडली. १८ जून १९४६ च्या राममनोहर लोहियांच्या तुकडीतल्या अन् नंतरच्याही अनेक सत्याग्रहींना याच किल्ल्यानं सांभाळलं.

'सांत कातारीन' चं नामांतर 'आग्वाद' कसं झालं, याची एक कथा आहे. अन् या घटनेचा साक्षीदार आजही आपल्याला अगदी दरवाज्याजवळच भेटतो. कोकणपट्टीमधल्या बहुतेक किनारी किल्ल्यांवर पाणी बेताचंच. पण एके दिवशी दरवाज्याजवळील एका खडकात गोड्या पाण्याचा एक जिवंत झराच मिळाला. उत्तम दर्जाचं अन् मुबलक असं पाणी मिळाल्यावर तत्कालीन किल्लेदारानं एक छोटा तलाववजा हौद तिथं बांधला. रहाट आणि

पन्हाळ्याची सोय करून हे गोड पाणी जहाजांना देण्याची आयतीच सोय झाली. या पाण्यासाठी जहाजंही आवर्जून इथं येऊ लागली. पोर्तुगीजांच्या भाषेत आग्वा म्हणजे पाणी. ते लोक मुबलक पाण्याच्या या अखंड झऱ्याला, 'माय द आग्वा' म्हणजे 'पाण्याची आई' म्हणू लागले. हळूहळू त्यापासून शब्दाची उलट-सुलट होऊन 'आग्वाद' हा शब्द निर्माण झाला अन् रूळलादेखील. 'आग्वाद' नावापाठीमागची ही कथा !

आग्वादच्या तट-बुरूजांवरून फिरताना पणजीचं सारं वैभव तर दिसतंच, पण पोर्तुगीज व्हाइसरॉयचं निवासस्थान असणारा काबो राजप्रसाद, कांदोळीचा थोडा भाग अन् अथांग सिंधुसागर दिसतो.

१० ऑगस्ट आग्वादच्या कालदर्शिकेतला एक महत्त्वाचा दिवस सां लौरेन्सु (सेंट लॉरेन्स) या ख्रिस्ती संताचा हा दिवस. त्या दिवशी आग्वादला जत्रा भरते. त्यात सहभागी व्हावं म्हणून मांडवी नदीमधील वाळूचा पट्टाही दूर सरकतो. अन् यात्रेकरुंना जहाजाने तिथवर येण्यास फक्त त्या दिवसापुरती मोकळीक देतो. असा दृढ विश्वास बऱ्याच जणांच्या मनी आजही बसतो आहे.

या किल्ल्यात एक दीपगृह आहे. सुरवाती सुरवातीला बारदेशच्या प्रशासनाच्या खर्चातून इथल्या तेलवातीचा खर्च होई. पुढे १८४१ मध्ये लोपिश द लीमच्या कारकीर्दीत स्वयंचलित यंत्रावर फिरणारा दिवा अन् दीडशे मण वजनाची घंटा इथं बसविली गेली. दर तासाला घंटेचा टोल बडविला जाण्याची तरतूद या यंत्रात केली गेली होती. पुन्हा १९०६ मध्ये या दीपगृहाचे नूतनीकरण झाले. सध्या मात्र किल्ल्याच्या तटबंदीबाहेर दुसरा दीपस्तंभ आहे व त्याचाच उपयोग केला जातो.

१८ जून हा आग्वादच्या आधुनिक इतिहासातला महत्त्वाचा दिवस गोव्याच्या विमोचनार्थ धडपडलेले सारे गोवेकर त्या दिवशी

आग्वादच्या वारीला येतात. हा तर खराखुरा क्रांतिदिन ! पावसाच्या सरींवर सरी कोसळत असतात अन् गोवेकरांच्या झुंडीच्या झुंडी इथे थडकत असतात. 'जयहिंद' म्हणायची जिथं एकेकाळी चोरी होती, तिथं आता मुक्त मनानं 'जयहिंद' चा घोष होतो. पूर्वस्मृती जागृत होऊन साऱ्या अंगावर रोमांच उभे राहतात. १८ जून १९४६ या दिवशी डॉ. राममनोहर लोहियांनी मुक्तिसंग्रामाचे रणशिंग फुंकले. या घटनेचा रौप्यमहोत्सव १९७१ मध्ये होता. स्वातंत्र्यसैनिक संघटनेच्या प्रेरणेने अन् गोवा शासनाच्या पुढाकाराने एक उत्कृष्ट शिल्प आग्वादच्या ऐन दारातच उभारले गेले.

श्री. विष्णू कुकळ्येकरांनी हे शिल्प तयार केलं आहे. अतिशय बोलकं असं हे स्मारक आहे. पुतळ्याचा चौथरा जुलमी पोर्तुगीज राजवटीचं प्रतीक असलेल्या किल्ल्याच्या भिंतीसारखा केला आहे. त्यावर गोमंतकाची स्वातंत्र्यलक्ष्मी दोन्ही हात उभारलेल्या स्थितीत उभी आहे. तिच्या हातातील तुटलेल्या बेड्या, पारतंत्र्याच्या शृंखलांची आठवण करून देतात. स्वातंत्र्यदेवतेच्या मागील बाजूस अशोकस्तंभ आहे. सार्वभौम हिंदी सत्तेचं ते प्रतीक आहे. थोड्या खालच्या बाजूस एक गोवेकर स्वातंत्र्य सैनिक, जुलमी राजवटीचा प्रतिकार करताना हौतात्म्य पत्करलेल्या आपल्या साथीदाराचे शव घेऊन उभा आहे, असं मोठे अर्थपूर्ण शिल्प या किल्ल्याचाच नव्हे, तर साऱ्या गोमंतकाचा इतिहास आपल्या पुढ्यात उभं करतं. पण या साऱ्या शिल्पाचे महत्त्व विशद करणारे शब्दांकन मराठीत न करता परक्या इंग्रजीत का ? हा प्रश्न सतत छळतोच.

आग्वादच्या किल्ल्यात हिंडाफिरायला आजही बंदी आहे. कारण इथं आहे कैदखाना. खरं तर गोव्याला स्वातंत्र्याचा आनंद उपभोगता येतो, पण आग्वादचा बंदिवास काही सुटला नाही. इथं तुरुंग असण्यामागचे कारण विचारले, तर उत्तर मिळते, पूर्वीही इथे बंदिगृह होते. वसाहतीचे पंख तुटलेला पोर्तुगाल आता

युरोपातला सर्वात दीनवाणा देश बनला. आहे आणि साडेचारशे वर्ष गोमांतकात नांदलेलं फिरंगाण आता नाहीसं झालं आहे. पोर्तुगीज दुर्गबांधणीचे एक अजोड असे बळिवंत ठाणे, आता पोर्तुगीजांच्या दडपशाहीतून सुटण्यासाठी केलेल्या रणसंग्रामाचं दर्शन घडविणाऱ्या वस्तू, चित्रे, फोटो, पुतळे, ग्रंथ यांचे संग्रहालय का बनू नये? आग्वादच्या पोटात हे असं काही उभारलं जाणं आवश्यक आहे. हा किल्ला त्या इतिहासाला साक्षी आहे. त्याने तो इतिहास नुसताच पाहिलेला नाही, तर सोसलेलाही आहे. काब-द-रामचा खोलगड, रेईश मागुश, फोंड्याचा मर्दनगड, गाश्पर, दियश, नानूस, साटेरी, तेरेखोल, शापोरा, अलोर्ना, राचोल, मार्मगोवा, सेंट एस्तेव्होस ऊर्फ कुंभार जुवे आदि गोमंतकीय किल्ल्यांचा राजा शोभणाऱ्या आग्वाद किल्ल्यावरच गोव्याच्या इतिहासाचे संग्रहालय उभारले जाणे आवश्यक आहे. तसे झाले, तरच गोव्यात येणारे पर्यटक इथे आवर्जून येतील. पर्यटकांची पंढरी बनलेल्या गोव्यातला हा विठोबा अद्याप अज्ञातच राहिला आहे.

२. किल्ले अंजदीव : (गोवा)

१८ डिसेंबर १९६१ - सोमवार - अनेक शतकाच्या काळरात्रीनंतर उगवलेला मुक्तिदिन. सप्टेंबर १४९८ ते डिसे. १९६१ असं चारशे त्रेसष्ट वर्षांचे पारतंत्र्य संपले होते. गोवा कारवाई सुरू झाली. अंजदीव बेट पहिल्याप्रथम मुक्त झाले. ३-३॥ कि.मी. लांब अन् अवघ्या एक कि.मी. रुंदीचं हे बेट. अतिशय मोक्याची जागा. एका बाजूला कारवार, दुसरीकडे सदाशिवगड. पण समावेश थोड्या अंतरावरच्या गोव्यात निसर्गाचा वरदहस्त, पिण्याजोगे मुबलक पाणी आणि भवतालचे खोल पाणी. जलवाहतुकीसाठी अन् त्यातल्या

थांब्यांसाठी आणखी काय हवं ?

१४९८ साली वास्को-द-गामा इथे बंदरी आला. त्याने तिथल्या सुभेदाराशी चार हात करून अंजदीवचा ताबा घेतला. पण गंमत अशी हा सुभेदार गयारामांचा पूर्वजच ठरला. त्याने चक्क खिस्तीधर्म स्वीकारून गॅस्पर-द-गामा नाव घेतलं आणि तो पोर्तुगीज आरमारात मोठा नाविक अधिकारी बनला. १५०२ साली दाभोळच्या परिसरात वास्को-द-गामा वादळात सापडला. तेव्हा त्याला या अंजदीववरच निवारा मिळाला. १५०५ मध्ये पोर्तुगीजांनी इथे एक किल्ला बांधला. याचा संदर्भ बर्थेमा या इटालियन प्रवाशाच्या वर्णनात मिळतो.

विजापूरच्या आदिलशहाला काही हे रुचले नाही. त्याने या बेटावर हल्ला चढवून पाहिला. पण पोर्तुगीजांची मनं, मनगटं अन् नशीब अधिक बळकट निघाली. १६८२ मध्ये पोर्तुगीजांनी जुनी तटबंदी पाडून टाकली पण पुन्हा नवी उभारली. संभाजीराजे, नंतरचे मराठी सत्ताधीश, हैदर आदिंनी अंजदीव जिंकण्याचे प्रयत्न केले, पण उपयोग काही झाला नाही. कालांतराने हिंदुस्थानचे सत्ताधीश म्हणून ब्रिटिश वावरू लागले. पण त्यांनी काही गोमंतक पोर्तुगीजांच्या जोखडाखालून मुक्त करण्याचा विचारच केला नाही. मग अंजदीवचे महत्त्वही कमी झाले. दाट जंगलयुक्त बेट, तिथले मूठभर सैन्य आणि थोडेफार दारूगोळा असणारे एक मामुली ठाणे असे त्याच स्वरूप झाले. पण तेवढ्या जोरावरदेखील गोवा कारवाईच्यावेळी तब्बल दहा तास त्याने टक्कर दिली. १८ डिसेंबर १९६१ रोजी दुपारी ३ वाजता पोर्तुगीज़ांनी शरणागती पत्करली. एका काळ्या पर्वाचा अस्त झाला.

मारूतीची आई अंजनी, तिचं वसतिस्थान म्हणजे अंजनी द्वीप, त्याचा अपभ्रंश होऊन झाले अंजद्वीप किंवा अंजदीव. दुसऱ्या कथेप्रमाणे हे मूळचे आर्यद्वीप, त्याचे झाले अंजदीव.

इथली दुर्गबांधणी मात्र खास पोर्तुगीजांच्या हातची. या बेटावरचे प्राचीन आर्यादुर्गेचे मंदिर पोर्तुगीजांनी बाटविले. पण त्यातली मूर्ती पुजाऱ्यांनी वाचवली आणि तिची स्थापना अंकोला गावी केली. त्या मूळच्या मंदिराचे रूपांतर चर्चमध्ये झाले. ते आजही पाहता येईल.

इथले विपुल पाणी, खोल समुद्र यांचा उपयोग करून एखादा नाविक तळ निश्चित विकसित करता येईल किंवा इथल्या निसर्गसमृद्धीचा फायदा घेण्यासाठी एक रमणीय सहल-केंद्रही येथे होऊ शकेल. कारवारच्या नौदल तळाला सहाय्यभूत ठरेल, अशीच काहीतरी योजना आखली जावी.

३. किल्ले जयगड व विजयगड : (जि. रत्नागिरी)

कोकणचे सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, रायगड, वसई, माहुली हे किल्ले प्रसिद्ध आहेत. पण अपरिचित किंवा अल्पपरिचित किल्ल्यांची संख्यादेखील खूप आहे. सध्याच्या रत्नागिरी जिल्ह्यात बाणकोटचा हिम्मतगड ऊर्फ फोर्ट व्हिक्टोरिया. मंडणगड, हर्णेचे सुवर्णदुर्ग - कनकदुर्ग - फत्तेगड - गोवा किल्ला, खेडजवळचे पालगड, महिपतगड, सुमारगड, रसाळगड, चिपळूणशेजारचा गोवळकोट ऊर्फ गोविंदगड आणि भैरवगड, देवरूखजवळचा मैमतगड, गुहागरजवळचे अंजनवेल ऊर्फ गोपाळगड, विजयगड, जयगड, रत्नागिरीचा रत्नदुर्ग किंवा भगवतीचा किल्ला अन् पूर्णगड; राजापूरजवळचे यशवंतगड अन् आंबोळगड असे तब्बल वीस किल्ले आहेत.

जयगड.

रत्नागिरीहून गणपतीपुळ्याकडे जाणाऱ्या रस्त्याने जायला

लागले की, ३०-३२ कि.मी. वर शास्त्री नदीच्या मुखाशी जयगड गाव आहे. एक चांगले नैसर्गिक बंदर म्हणून जयगडची आजही ख्याती आहे. गावातल्या किल्ल्यामध्ये मात्र फारच दुर्लक्ष झालेले आहे. जयगड गावाच्या उत्तरेस गावाला खेटूनच हा किल्ला असला, तरी त्याची फारशी माहिती गावात कोणालाही नाही.

जयबाचे बलिदान.

हा किल्ला केव्हा बांधला गेला याबद्दल उल्लेख आढळत नाहीत. परंतु याच्या निर्मितीच्या वेळी विजापूरकरांना हे बांधकाम पूर्ण करण्यात यश येईना. सतत पडणाऱ्या या बांधकामाच्या पूर्ततेसाठी एक नरबळी हवा होता. जयबा या महार जमातीच्या एका वीराने स्वखुशीने किल्ल्याच्या पायात स्वत:ला गाडून घेतले. किल्ल्याच्या मुख्य तटबंदीत प्रवेश केला की, उजव्या हाताच्या तटाला चिकटून 'किल्लेकराचे स्मारक' या घटनेची स्मृती म्हणून आजही दाखविले जाते. जयबाच्या या आत्मबलिदानामुळेच किल्ल्याचे नाव जयगड ठेवण्यात आले. या छोटेखानी किल्ल्याला डझनभर बुरूज व सुस्थितीतील तटबंदी आहे.

समुद्रात एक भूशिर घुसले आहे. याच्या पश्चिम टोकावर करहाटेश्वरावे रमणीय ठिकाण आहे, तर पूर्व टोकावर खाडीच्या ऐन मुखाशी जयगड पाय रोवून उभा आहे. एका ६० मीटर उंचीच्या टेकडीवर असणाऱ्या सागरतटावरील या किल्ल्याच्या निर्मितीचे श्रेय जरी विजापूरकर आदिलशाहीकडे जात असले तरी ते त्याना राखता आला नाही.

विजापूरकरांकडून संगमेश्वराच्या नाईकांकडे या किल्ल्याचा ताबा गेला. त्याच्या ताब्यातून किल्ला परत मिळवण्याचे दोन प्रमुख प्रयत्न १५८३ व १५८८ मध्ये विजापूरकर आदिलशहा अन् हिंदुस्थानात बस्तान बसवू पाहत असणारे पोर्तुगीज यांनी

केलेले आढळतात. या संयुक्त आघाडीचाही उपयोग झाला नाहीच. पुढे शिवकालात हा किल्ला नक्की केव्हा, कसा, कोणी मराठ्यांकडे आणला याची माहिती उपलब्ध नाही. पुढे आलमगिरी वावटळ आणि शाहूचे पुनरागमन या दोन घटनांच्या वेळी या किल्ल्यासंबंधाने महत्त्वाचे काही घडलेले आढळत नाही. पण बाळाजी विश्वनाथ पेशव्यांच्या मध्यस्थीने कान्होजी आंग्रे शाहूराजांच्या पक्षाकडे आले. तेव्हा दहा किल्ले आंग्र्यांकडे रहावेत असा तह झाला. १७१३ च्या या तहान्वये तो आंग्र्यांकडे आला. पुढे मात्र तो पेशवाईत कसा दाखला झाला यासंबंधी माहिती मिळत नाही. १८१८ च्या शेवटच्या इंग्रज-मराठे युद्धात विनाप्रतिकार याचा ताबा इंग्लिशांकडे गेला.

टेकडीच्या माथ्यावरील या किल्ल्याच्या तटबंदीला वीस बुरूज आहेत, तसेच दक्षिणेकडील आग्नेयाभिमुख महादरवाजा व पूर्वेकडील चोर दरवाजा आहे. आग्नेय व पूर्वेच्या बाजूला समुद्राच्या पाण्यापर्यंत माथ्यावरील मुख्य तटबंदीपासून सागरतटाशी असणाऱ्या तटबंदीपर्यंत बुरूजयुक्त तटबंदी आहे. या बंदिस्त भागात थोडी वस्ती व पाण्याच्या विहिरी आहेत. यातील बहुतेक जागा खाजगी आहे.

आदिशक्ती मोहमाया.

या बंदिस्त भागात किल्ल्याच्या तटाला लागून असणाऱ्या कातळकड्यात एक बळद किंवा गडद आहे. या गुहेत वरपर्यंत जाण्यास खोबणी आहेत. घाटग्यांच्या या कुलदेवतेला मोहमायादेवी म्हणतात. शिमग्याचे दिवशी या देवीचा उत्सव साजरा करतात. याच भागात दाट झाली आहे व त्यात अगदी वैशिष्ट्यपूर्ण असे चौकोनी ५-७ मीटर उंचीचे एकसंध स्तंभ जांभ्या दगडात कोरलेले आहेत. त्यांचा उपयोग कशासाठी केला जातो हे कोणालाही

माहिती नाही. सातारा जिल्ह्यातील चंदन-वंदन किल्ल्यांवरील पाषाणस्तंभांसारखे हे वाटतात. किल्ल्याच्या या वस्ती असणाऱ्या भागातच तटबंदीच्या एका बुरूजावर पाच साळुंखा असणाऱ्या श्रीकार्तेश्वराचे मंदिर असावे. इथल्या दाराशेजारीच मारूतीची मूर्तीही कोरलेली आहे. तटबंदीबाहेर गोड्या पाण्याचा जिवंत झरा व पाण्याचा हौद आहे. या भागातच पूर्वी पडाव-होड्या-गलबते किनाऱ्याला लागत असत.

किल्ल्यातील स्थळविशेष –

मुख्य तटबंदीच्या जमिनीकडील बाजूकडे दीड-दोन मीटर लांबीचा अन् जवळजवळ तितक्याच खोलीचा खंदक आहे. अंजनवेलचा गोपळगड अन् गोव्याचा आग्वादचा किल्ला येथेही असे खंदक आहेत. किल्ल्याच्या कोणत्याच दारावर शिल्पे नाहीत, मात्र मुख्य दरवाज्यावर गिलाव्यातच कोरलेली कमळे आहेत. दारातून आत येताच इथले सर्व भग्नावशेष लक्ष वेधून घेतात. पश्चिम तटबंदीतील खोल्या किंवा कोठारे लक्ष वेधून घेतातच. पण इथल्याच एका बुरूजाच्या माथ्यावर एक भव्य शासकीय विश्रामधाम आहे. सरकारी अधिकाऱ्यांखेरीज फारसे कोणी येथे उतरत नाही. कारण बाकी सर्व सोयींचा अभाव.

खरं तर तेरेखोलच्या किल्ल्यातील पर्यटन केंद्राच्या तोडीचे, नव्हे, त्यापेक्षा देखणे पर्यटनस्थळ इथे निर्माण करता येईल. वायव्य कोपऱ्यात सदर, उत्तर तटानजीक पातळभेदी विहिरी, मध्यभागी किल्लेदाराचा वाडा, दोन तलाव आणि गणपतीचे मंदिर आहे. नैऋत्य कोपऱ्यात चोरदरवाज्याजवळ छोटेसे सिग्नल पोस्ट आहे. दक्षिणतटाजवळील बुरूजाशेजारी जयबाचे स्मारक म्हणजे किल्लेकरांचे ठिकाण आहे. इथल्या बुरूजांना, विहिरींना नावे होती की नाही हे ग्रामस्थांनाही माहिती नाही. १८६२ मध्ये किल्ल्यावर

पंचावन्न तोफा होत्या यांतील एकही तोफ आढळत नाही. महाराष्ट्रातील किल्ल्यांवरील तोफांचे काय झाले हा एक प्रश्नच आहे.

दुर्ग परिसर.

जोग मंडळींचे कुलदैवत असणारा करहाटेश्वर महादेव, जयगडापासून अवघ्या तीन-साडेतीन किलोमीटरवर असणारा विजयगड हा छोटा गढीवजा किल्ला, शांडिल्य गोत्रीय जोशांची कुलस्वामिनी असणारी कोळिसरे येथील लक्ष्मी-केशवाची देखणी मूर्ती अन् द्वारदेवता गणपतीपुळे येथील श्रीगणेश मिळून मस्त टूरिस्ट कॉम्प्लेक्स तयार झाला आहे. रत्नागिरीपासून अगदी जवळ असणाऱ्या या परिसराचा पर्यटन-विकास साधला जाणे काही फारसे कष्टदायक नाही. सध्या मात्र आगाऊ पत्रव्यवहारानंतर जयगडच्या डॉ. जोगांकडील आतिथ्यशील पाहुणचाराचाही फायदा घेता येतो.

युवक प्रगती सहयोग.

साहसी मनांना सह्याद्रिची साद ऐकू येते. पण पश्चिमेच्या सिंधुसागराकडे कोणाचे फारसे लक्षही जात नाही. त्या समृद्ध रत्नाकराची जवळून ओळख करून देणारी सागर-परिचय शिबिरे जयगडाच्या श्री. मीलन जोगांच्या मदतीने सहज शक्य होतात. त्यामध्ये समुद्रपर्यटन, मासेमारी यातील प्रत्यक्ष अनुभव मिळवता येतात. नांदिवड्याच्या शांत समुद्रकिनारी सागरस्नान करता येते. संदखोलचा समुद्रकिनारा म्हणजे सागरी जीवसृष्टीचा खजिनाच आहे. आपापल्या गावच्या निसर्ग अभ्यास मंडळाच्या अभ्यास सहलींचं तिथे स्वागतच होईल. मात्र आधी पत्रव्यवहार करून, पक्कं ठरवून मगच जायला हवं.

श्री. करहाटेश्वर.

एकांत स्थळी हा सुरम्य विलसे,
नामे करहाटेश्वर ।
पायी सागर नित्य हा बसतसे,
गर्जोनिया गंभीर ॥ (नारायणबुवा जोग रामदासी)

करहाटेश्वराइतके रम्य ठिकाण अन्यत्र शोधून सापडणार नाही. शिलाहार राजांनी दहाव्या-अकराव्या शतकात श्रीकरहाटेश्वराची स्थापना केली. रम्य निसर्ग आणि नीरव शांतता ही याची वैशिष्ट्ये. बोभाटी गंगा, गोमुख कुंड, दगडी बांधणीची धर्मशाळा, बकुळीचा डेरेदार वृक्ष अन् नेच्यांनी मढवलेली कातळभिंत आवर्जून पहावी अशी. १६००, १७६४, १९२१, ते १९२५, १९७० असे चार जीर्णोद्धार या देवस्थानाचे झालेले आहेत. जोग कुलोत्पन्नांनी आपल्या कुलदेवतेच्या चरणी आपली सेवा दर वेळी रूजू केली आहे.

कोळीसऱ्याचे लक्ष्मीकेशव मंदिर.

चाफे फाट्यानजीकच्या कोळिसरे फाट्याजवळ असणारे श्री.लक्ष्मीकेशवाचे देखणे परब्रह्म पहायलाच हवे असे आहे. या श्रीपती विष्णूची गंडकी शिळेतून कोरलेली काळसर तांबूस रंगछटेची मूर्ती अप्रतीम आहे. मराठे या पुजाऱ्याकडे आगाऊ पत्रव्यवहाराने थोडीफार सोय होऊ शकते. ह्या निसर्गसुंदर ठिकाणाची यात्रा आपण करायलाच हवी. तिथल्या निसर्गाचा उघड्या डोळ्यांनी धांडोळा घ्यायला हवा. योग्य वेळी गेलं तर झाडांवर केलेली काजव्यांची आरासही पाहता येते. रत्नागिरी ते कोळिसरे अशी थेट बससेवाही उपलब्ध आहे.

सूर्यमंदिरे.

प्रभासपट्टणाची लूट झाल्यानंतर गुर्जरभूमीतील सूर्यमूर्ती

विस्थापित झाल्या. कोण्या एका भक्ताने तेथील सर्व सूर्यमूर्ती एका गलबतात घातल्या व ते गलबत दक्षिणेकडे हाकारले. कर्मधर्मसंयोगाने ते गलबत जयगड-रत्नागिरी परिसरात किनाऱ्याला लागले. नेवरे, देऊड, आंबव, आरवली, कशेळी आणि खारेपाटण येथे सहा सूर्यमूर्तींना थारा मिळाला. या साऱ्या सूर्यमंदिरांवर अन् मूर्ती शिल्पांवर अभ्यासकांनी प्रकाश पाडायला हवा आणि या दंतकथेवर प्रकाश टाकायला हवा.

रत्नागिरी.

जयगडला जायचे तर रत्नागिरीला जायलाच हवे. तेथील लोकमान्य टिळकांची जन्मभूमी, स्वातंत्र्यवीर सावरकरांचे वास्तव्य असणारे घर, पतीत पावन मंदिर, थिबा राजाचा राजवाडा, ब्रह्मदेशच्या या थिबा राजाचे स्मारक, काळा व पांढरा समुद्र, रत्नागिरीचा किल्ला, मत्स्यमहाविद्यालय हे अन् असंच कितीतरी आपल्या परिचयाचं आहे.

४. किल्ले देवगड : (जि. सिंधुदुर्ग)

विजयदुर्गच्या दक्षिणेस १८-२० कि.मी. अंतरावर देवगड किल्ला-गाव व बंदर आहे. ७ एप्रिल १८१८ रोजी याचा ताबा इंग्रजांतर्फे कर्नल इम्लाकने घेतला. याव्यतिरिक्त फारशा घडामोडी या किल्ल्यावर झाल्याचे माहिती नाही.

देवगड किल्ल्याचा इतिहास फारसा परिचित नसला आणि तिथे पाहण्यासारखं काही नसलं तरीदेखील देवगड गाव - किल्ला व परिसर एका गोष्टीसाठी विशेष प्रसिद्ध आहे. मुंबईच्या हाफकिन इन्स्टिट्यूटला विविध तऱ्हेच्या सर्पांच्या विषापासून औषधी इंजेक्शने

तयार करण्यासाठी फुरसे जातीचे साप पुरवण्याचे प्रमुख केंद्र म्हणजे देवगड होय.

देवगड हे एक सुरक्षित बंदर आहे. तेथे एक उत्तम तऱ्हेचे दीपगृहही आहे. देवगड किल्ल्याचा तट समुद्राच्या बाजूला उभ्या तुटलेल्या कड्यांमुळे खूपच सुरक्षित झालेला आहे.

देवगड किल्ल्याशेजारी कुणकेश्वर नावाचे छोटे गाव आहे. तेथे २०-२२ मीटर उंचीचे श्री कुणकेश्वराचे मंदिर आहे. मुद्दाम जाऊन पहावं असं हे शिवस्थान नक्कीच आहे. हे शिवलिंग जांभ्या दगडाचे व साळुंखा काळ्या पाषाणाची आहे. यादवांनी बांधलेल्या या देवालयाचा जीर्णोद्धार शिवाजी महाराजांनी नीळकंठ बावडेकरांना सांगून करवून घेतला अशी नोंद मिळते.

देवालयाच्या प्राकारातच उत्तरेस श्री जोगेश्वरीचे छोटे देवालय आहे. याच्या समोर दोन दीपमाळा व तुळशीवृंदावर आहे. कुणकेश्वराकडे तोंड करून बसलेला एक नंदी तेथील चबुतऱ्यावर सुप्रतिष्ठित आहे. नंदीचे मागे श्रीदेव मंडलिक नावाचे छोटे शिवमंदिर आहे. त्याच्या थोडे पुढे गेले की नारायणाचे मंदिर आहे. नारायणाची सांगसायुध चतुर्भुज मूर्ती आहे. देवळात एक जुनी तोफही आहे. यापुढे एक श्री गणेश मंदिर आहे. या सर्व प्राकाराच्या मध्यभागी श्री कुणकेश्वराचे देवालय आहे. मंदिराच्या बाहेर चार भव्य स्तंभ आहेत. त्यांच्या मधोमध वर्तुळाकृती कासव आहे. मंदिराच्या तुळ्यांवर खूपच कोरीव काम केलेले आढळते.

देवगडला आता वाऱ्यापासून वीज निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न सुरू झाला आहे. अपारंपरिक ऊर्जास्त्रोत वापरुन प्रदूषणमुक्त वीज मिळवणं कितपत फलदायी आहे, हे त्यातून कळेल.

५. किल्ले निवती : (जि. सिंधुदुर्ग)

मालवण-वेंगुर्ल्याच्या मधे कोचरे गावात समाविष्ट होणारा एक सुंदर किल्ला आहे. त्याचं नाव निवतीचा किल्ला. समुद्रापासून ५० मीटर उंचीच्या टेकडीवर हा किल्ला बांधलेला आहे. किल्ल्याच्या रुंद तटाबाहेर एक खंदक खोदलेला आहे. किल्ल्यात भग्नावशेष करवंदीच्या झाडोऱ्याखाली झाकले गेले आहेत. ही करवंदे खूप मोठी, टपोरी व गोड आहेत.

निवतीच्या किल्ल्यावरून भोगवे गावचा लावण्यमयी समुद्रकिनारा भुरळ घालतो. हिरवी झाडी, तांबड माती यांना इथे जोड मिळाली आहे, रुपेरी वाळू अन् चंदेरी दर्याची. मालवण ते गोवा अशा प्रदेशावर टेहळणी करण्यास उत्तम जागा म्हणजे निवती. येथे फारसे काही महत्त्वाचे घडले नसावे. इतिहासाबद्दल मुग्ध असणारा हा बलदंड किल्ला आहे. १७८६ मध्ये कोल्हापूरकर छत्रपतींनी हा वाडीकर सावंतांकडून घेतला. पुढे १८०३ मध्ये तो सावंतांना परत दिला. यानंतरच्या काळात निवतीच्या किल्ल्याच्या स्वामित्त्वावरून दोघांमध्ये सतत कुरबुरी चालूच होत्या. १८१८ मध्ये कोकण प्रांताचा ताबा पेशव्यांकडून इंग्रजांकडे आला. पण निवती आणि रेडीचा यशवंतगड येथील किल्ल्यांचा आश्रय घेऊन आसपासच्या मुलखाला उपद्रव देण्याचे काम सुरू झाले. म्हणून १८१९ मध्ये कीर साहेब फौज घेऊन चालून आला. २ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी प्रतिकार झाल्यावर मग तो कीरच्या इंग्लिश सैन्याने जिंकला.

६. किल्ले पूर्णगड : (जि. रत्नागिरी)

रत्नागिरीहून भाट्याच्या खाडीवरील पुलामुळे पावस-पूर्णगड हा परिसर पाहून येणं अधिक सुलभ झालं आहे. मुचकुंदी नदीच्या खाडीमुखाशी, सागरकिनारी पण उंच टेकडीवर हा किल्ला आहे. एखादी गढी असावी असा हा छोटा किल्ला आहे. पूर्णविरामाच्या टिंबासारखा लहान म्हणूनही याचे नाव पूर्णगड पडले असावे. काहींच्या मते शिवरायांनी किल्लेबांधणीचे काम इथे थांबवले म्हणून हा पूर्णगड.

पूर्णगड गावातून वर चढू लागले की याचा तट दिसू लागतो. किल्ल्याच्या दारातच एक भव्य अशी मारूतीची मूर्ती आहे. किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर चंद्र-सूर्य व गणपती कोरलेला आहे. आत प्रवेश केला की डाव्या हातास एक वृंदावन आहे. तर उजव्या हातास तटानजीक किल्लेदाराचा वाडा आहे. किल्ल्यात काही तोफा असल्याचे उल्लेख मिळतात. आता काहीही नाही. किल्ल्यात पाणीपुरवठ्याची सोय नसावी. दाराबाहेर मात्र एक विहीर होती. ती देखील आता बुजू लागली आहे. किल्ल्याचा समुद्राकडील भिंतीचा थोडा भाग पडला आहे. तेवढा सोडला तर बाकी बांधकाम उत्तम आहे. समुद्राकडील दरवाज्याने बाहेर पडले की फार रमणीय देखावा दिसतो.

७. किल्ले भगवंतगड आणि भरतगड : (जि. सिंधुदुर्ग)

मालवण तालुक्यातच कालावली खाडीच्या उभय अंगास मालवणच्या दक्षिणेस १६ कि.मी. वर मसुरे गावाजवळ किल्ल्यांची ही जोडगोळी आहे. आसपासची झाडी, पाण्याने गच्च भरलेली

खाडी, त्यातून ये-जा करणाऱ्या होड्या; मालवण ते मसुरे अशी एस.टी. बसची सोय या सगळ्या अनुकूल गोष्टींमुळे हे किल्ले पहायला त्रास असा काही होतच नाही. सकाळच्या मालवण-मसुरे गाडीने मसुरे गावी यावे. या एस्. टी. च्या प्रवासास साधारण १॥ ते २ तास लागतात. तिकीटदेखील दीड-दोन रूपयांच्या आसपासच आहे. तेथून खाडीपर्यंत येण्यास, दहा-पंधरा मिनिटे पुरतात. होडीच्या सहाय्याने पलिकडील तीरावर गेले की गडाचा पायथाच लागतो. दुरून साजरागोजरा भासणारा हा भगवंतगड मोठा सुदर्शन आहे. आसपासच्या भागात उठून दिसणाऱ्या, गर्द झाडीने वेढलेल्या टेकडीच्या माथ्यावर हा लहानसा किल्ला बांधलेला आहे. हा किल्ला फोंड सावंत १७०१ मध्ये भरतगडाचे बांधकाम करीत असतानाच, त्याला प्रत्युत्तर म्हणून त्यांचे प्रतिस्पर्धी बावडेकर यांनी बांधला. गडावर एक छोटेखानी मंदिर आहे. ते आहे भगवंताचे, म्हणून तर किल्ल्याचे नाव भगवंतगड !

मोठ्या भक्तिभावाने पाणी-फुले अर्पण करणाऱ्या तिथल्या एका आजीबाईंना मी मुद्दाम विचारले, ''भगवंताची मूर्ती इथे कशी नाही?'' देवावरील नजर न ढळू देता आजी उत्तरल्या, ''देव जसा निर्गुण, निराकार असतो तसाच हा भगवंत आहे !'' देवळात अत्यंत खाबडखुबड व कृत्रिमतेचा अजिबात स्पर्श न झालेला खडक आहे. त्याचीच ग्रामस्थ भगवंत म्हणून पूजा करतात. पण या अशा आडवळणी गावी एखाद्या वयस्क स्त्रीकडून हे अत्यंत समयोचित उत्तर ऐकून मी तर चाटच पडलो. या किल्ल्यावर विशेष महत्त्वाची घटना घडलेली नसावी किंवा घडली असलीच तर ती नोंदली गेली नसावी.

इ.स. १८१८ मध्ये कर्नल इम्लाकने हा किल्ला मराठ्यापासून घेतला. त्यावेळची सुस्पष्ट हकीगत नोंदलेली आढळते. इम्लाक आपल्या फौजेनिशी २९ मार्च १८१८ रोजी रात्री पायथ्याशी

येऊन पोहोचला व रात्रीच्या रात्रीत मेढेकोट तयार करून, ऐन सकाळी त्याने किल्ल्यावर तोफांचा भडिमार चालू केला. परंतु या तोफा नदीच्या पैलतीरावर असल्याने मारा योग्य जागी होत नव्हता. म्हणून किल्ल्याच्या तटाला शिड्या लावून प्रत्यक्ष हल्ला करावा, या हेतूने कॅप्टन ग्रे व पिअरसन यांच्या हाताखाली दोन तुकड्या देऊन त्यांना खाडीपलीकडे पाठविले आणि आमचे शूरवीर, मर्द सैनिक (?) ह्या इंग्रज तुकड्या येत असलेले पाहून पळून गेले. ही घटना घडली ३० मार्च १८१८ रोजी. कुठे पुरंदर-सिंहगड-वासोट्याचा प्रतिकार आणि कुठे ही नामुष्की! घर फिरले की वासेही फिरतात हेच खरे. अगदी अलिकडे ह्या किल्ल्याच्या पडक्या बुरूजांचे व तटांचे आसपास १४-१५ तोफा होत्या. आता त्यांचे काय झाले याचा मात्र पत्ता लागत नाही. किल्ल्यावर पाणीपुरवठा असण्याची सोय दिसत तरी नाही. कदाचित कालौघात ती विहीर वा टाके बुजूनही गेले असेल.

होडीतून परत मसुरे गाव येऊन भरतगडावर जाता येते. भगवंतगड पहायला अर्धापाऊण तास पुरे होतो. मसुऱ्याहून तिथे जायला होडीभाडेही माफक आहे. भरतगडाचा विस्तारही चांगला आहे. लांबुळक्या माथ्याचा बालेकिल्ला, १५० मीटर लांब अन् ३० मीटर रुंद आहे. तटही चांगला दोन मीटर रुंदीचा व मजबूत आहे. त्या तटाभोवती खंदक आहे. उत्तर व दक्षिण दिशेस एकेक बुरूज असून मध्येही एक बुरूज आहे. त्याला वर जाण्यास पायऱ्याही आहेत. उत्तर तटाजवळ ६०-७० मीटर खोल विहीर आहे. हाच काय तो किल्ल्यावरील पाण्याचा एकमेव पुरवठा. याबद्दलची हकीगत अशी -

या डोंगरावर किल्ला बांधावा म्हणून शिवाजीमहाराज स्वत: इ.स. १६७० मध्ये पाहणी करण्यास आले होते, पण पाण्याची सोय होण्याची शक्यता न वाटल्याने त्यांनी तो बेत रहीत केला.

पुढे १६८० चे सुमारास वाडीकर फोंड सावंत व कोल्हापूरचे पंतप्रतिनिधीं यामध्ये तंटा सुरू झाला. म्हणून संकटसमयी रक्षणासाठी याच डोंगरावर फोंड सावंतांनी किल्ला बांधण्याचे ठरविले. किल्ल्यास पाण्याची सोय आतच हवी म्हणून त्याने ही विहीर प्रथम पाडली व पाणी लागल्यावर मगच किल्ला बांधला.

या बालेकिल्ल्याच्या बाहेर मुख्य तटाला अर्धचंद्राकृती असे सुमारे दहा बुरूज आहेत. या तटाची उंची ४ मीटर असून त्याबाहेर खंदक आहे. तट अजूनही मजबूत आहे. अगदी अलिकडे येथे १८-२० तोफा होत्या. आता मात्र त्या तेथे दिसत नाहीत. सध्या या किल्ल्याची जागा कोणा खाजगी वहिवाटदाराकडे असून त्याने तेथे नारळी-सुपारी, आंबा-जांभूळ अशा अनेक उपयुक्त वृक्षांची दाट लागवड केली आहे.

इ.स. १८१८ मध्ये कॅप्टन हचिन्सनच्या तुकडीने भरतगडावर सोडलेल्या तोफगोळ्यांमुळे या विहीरीचे पाणी आटून गेले. बहुधा एखाद्या तोफगोळ्यामुळे खालील दगडात भेग पडून त्यातून पाणी झिरपत असावे. किल्ला ताब्यात घेतल्यावर त्यांना काही लाकडी डोणी पाणी साठवण्यास वापरत असल्याचे आढळून आले होते. फोंड सावंतांच्या आमदनीत येथे काही झटापटी झाल्याचीही नोंद आढळते.

मालवणच्याच परिसरात वेताळगड व सिंधगड असे आणखी दोन किल्ले आहेत. त्यावर मात्र पाहण्यासारखे विशेष अवशेष नाहीत. मात्र वेताळगडाजवळच मोगरणे धामापूर या गावाजवळील धामापूरचा तलाव व शेजारील मंदिर प्रेक्षणीय आहे. पर्यटन विकास महामंडळ सिंधुदुर्गाकडे लक्ष पुरविणार आहे. आता तर सिंधुदुर्गावर वीजपुरवठा सुरू झाला आहे. त्याचबरोबर भरतगड, भगवंतगड, निवती या किल्ल्यांची व धामापूर तलावाची पर्यटकांना माहिती दिली तर या परिसरास चांगले दिवस येण्याची शक्यता आहे.

ताडगोळे, शहाळी, आंबे, फणस, काजू, अननस यांनी समृद्ध असणाऱ्या या भागात अशी छोटी छोटी आकर्षणकेंद्रे सोयी करून विकसित केली तर स्थानिक लोकांचाही फायदा होईल.

८. किल्ले रत्नागिरी : (जि. रत्नागिरी)

तसे पाहिले तर महाराष्ट्रातील प्रत्येक किल्ला आपापल्या परीने मोठा आहे. काही ठिकाणी प्रचंड युद्धे झाली; काही ठिकाणी लढाया झाल्या, काही ठिकाणी चकमकी झाल्या, तर काही ठिकाणी घडलेला इतिहास ज्ञात नाही, नोंदवलेला तर नाहीच नाही, परंतु शिवशाही व नंतरच्या कालखंडात अनेक घराणी उदयास आली. आम्हा घाणेकरांचा या स्वांतत्र्ययुद्धात कोठे उल्लेख आढळतो का यासाठी काही ग्रंथ मुद्दाम चाळले असता कोणी एक घाणेकर रत्नागिरी किल्ल्याचे किल्लेदार होते. असा उल्लेख आढळतो. म्हणून मला या किल्ल्याबद्दल नेहमी आपलेपणा वाटतो.

१३०० मीटर लांब अन् १००० मीटर रुंदीचा हा किल्ला थोडासा घोड्याच्या नालेच्या आकाराचा आहे. या किल्ल्याच्या तीन बाजूंना समुद्र आहे. फक्त अग्नेय दिशेने तो मुख्य भूमीशी जोडला गेला आहे.

या किल्ल्याचे आतला आणि बाहेरचा असे दोन भाग आहेत. किल्ल्यात जाण्यासाठी अग्नेय दिशेकडून रस्ता आहे व दरवाजा साधारण मध्यावर असून रत्नागिरी शहराभिमुख आहे. या दरवाज्याच्या अलीकडे डोंगर फोडून, श्री. भागोजीशेट कीरांनी बांधलेल्या मंदिरापर्यंत बस जाण्याइतपत रस्ता बांधला आहे. किल्ल्यास चांगला लांब, रुंद आणि भक्कम तट बांधलेला आहे.

अग्नेय कोपऱ्यापासून ते अगदी दीपगृह उभारलेल्या सिद्द बुरूजापर्यंत तट आहे. पुढे मात्र समुद्राच्या बाजूस तुटलेला कडा ३०-४० मीटर उंचीचा असल्याने, फक्त कमी उंचीच्या ठिकाणी तुटक-तुटक तट घातल्याचे आढळते. वायव्य कोपऱ्यात साधारणपणे साठ मीटर उंचीची एक टेकडी आहे आणि त्यास सर्व बाजूंनी तटबंदी केली आहे. तोच गडाचा बालेकिल्ला. आता नवीन भगवती बंदराकडून बालेकिल्ल्याच्या प्रवेशद्वारापर्यंत येण्यास जीपगाडी जाईल इतपत कच्चा रस्ता केला आहे.

बालेकिल्ल्याचे वैशिष्टयपूर्ण प्रवेशद्वार बऱ्याच उंचीवर असून तेथील तटही चांगला भक्कम आहे. ठिकठिकाणी माऱ्याच्या जागा व बुरूज आहेत. बालेकिल्ल्यावर सुस्थितीत असणारी एकमेव वास्तू म्हणजे श्री. भगवती देवीचे मंदिर. दरवर्षी नवरात्रात या देवीचा उत्सव असतो. अलिकडेच म्हणजे इ. स. १९५० मध्ये या संपूर्ण देवालयाचा जीर्णोद्धार झाला आहे. अजूनही अधून-मधून दुरुस्ती, रंगकाम इ. यथाशक्ती चालू असते. या देवीच्या उत्सवात एक मुसलमान मानकरी पण आहे. याबद्दल त्याला एक सनदही मिळालेली आहे. देवालयानजीक एक विहीर आहे. त्या विहिरीतच एक उत्तम पायऱ्या बांधलेला बोगदा आहे. किल्ल्याच्या पायथ्याशी नैऋत्य व वायव्य कोपऱ्यात काही बोगदे आहेत. ते या विहिरीतील बोगद्यात येऊन मिळत असावेत. परंतु तसे प्रयत्न वा संशोधन केल्याचे ज्ञात नाही. किल्ला शत्रूच्या ताब्यात जाण्याची वेळ आली तर कदाचित सुटका करून घेण्याइतपत हा मार्ग असेलही.

ज्या बुरूजावर हल्ली दीपगृह आहे, त्याला 'सिद्द बुरूज' म्हणतात. एकदा विजयदुर्गाच्या धुळपांशी लढाई चालू असता किल्ल्यातील प्रमुख सरदार सिद्दी हा तेथे धारातीर्थी पडला. त्याच्या स्मरणार्थ ह्या बुरूजास त्याच्याच नावाने ओळखले जाते. साधारणपणे समुद्रसपाटीपासून १०० मीटर उंचीवर हा दीपगृह

स्तंभ आहे. त्यात रात्री दिवा असतो तो सुमारे पंधरा कि.मी. परिसरात दिसतो.

इतिहास

स्थानिक माहितगार व उपलब्ध साधनांच्या आधारे असे म्हणता येते की बहामनी राजवटीत (इ.स. १३४३ ते इ.स. १५००) या किल्ल्याची अधिक मजबूती करण्यात आली. पुढे आदिलशाही कालखंडात (इ.स. १५०० ते १६००) या किल्ल्यासंबंधी विशेष नोंदी आढळत नाहीत. मात्र शिवरायांच्या स्वराज्यात हा जलदुर्ग इ.स.१६७० मध्ये दाखल झालेला आढळतो. त्यानंतर या किल्ल्याची तटबंदी अधिक संरक्षणक्षम बनवून हे मोक्याचे लष्करी ठाणे बनवले गेले. तीच परंपरा धोंडू भास्कर प्रतिनिधी यांनी इ. स. १७९० मध्ये चालविल्याचे आढळून येते.

इ.स. १७६१ मध्ये झालेल्या पानिपत युद्धात पेशव्यांचे अग्रणी सेनापती श्रीमंत सदाशिवरावभाऊ मारले गेल्याची सार्वत्रिक समजूत खोटी आहे, असे बऱ्याच लोकांना बराच काळ भासवणारा भाऊसाहेबांचा तोतया, (खरेखोटे केवळ परमेश्वरच जाणे.) रामचंद्र नाईकांच्या आधिपत्याखालील रत्नागिरी किल्ल्यात कैदेत ठेवला होता. पुढे त्यांची खात्री पटवून हे भाऊसाहेब (?) तेथून निसटले. पण अधिक पराक्रमी व यशस्वी श्रीमंत थोरले माधवराव यांच्या हाती ते पुन: पडले. दरम्यान सर्व राजकीय व सामाजिक जीवन त्यांनी ढवळून काढले हे मात्र खरे.

अलिकडेच रत्नागिरी शहराचे व्यापारी महत्त्व वाढविण्याच्या दृष्टीने किल्ल्यानजीकच बारमाही बंदराच्या बांधकामास सुरूवात झाली आहे. तशा अर्थाचा कोनशिला स्तंभ भगवती मंदिराजवळील बुरूजावर उभारण्यात आला आहे.सिमेंटचे ट्रायपॉडस् टाकून ही बंदरउभारणी चालू आहे. संकल्पित कोकण रेल्वे व बारमाही

भगवती बंदर यामुळे महाराष्ट्रातील या अंदमानाचा सर्वांगीण विकास मोठ्या जोरात होईल यात शंका नाही.

रत्नागिरीच्या या भगवती किल्ल्याचा उल्लेख काही ठिकाणी रत्नदुर्ग असाही केलेला आढळतो. या किल्ल्याबरोबरच रत्नागिरी जिल्ह्यातील लोकमान्य टिळकांची जन्मभूमी, सावरकरांचे बंदिस्थान, पतितपावन मंदिर, थिबा राजाचा राजवाडा व त्याचे स्मारक अशा अनेक गोष्टी पाहण्याजोग्या आहेत. भाट्याच्या खाडीपलीकडे असणाऱ्या भाट्ये गावातील मानाजी ऊर्फ मायनाक भंडारी या दर्यासारंगाचे स्मारकही अवश्य भेट देण्याजोगे आहे.

९. किल्ले विजयदुर्ग ऊर्फ (घेरीया) : (जि. सिंधुदुर्ग)

अभेद्य जलदुर्ग

शिलाहारकालीन अशा या पुरातन किल्ल्याचे स्वामित्व शिवरायांकडे आले आणि त्यांनी आपल्या वाढत्या आरमारी सत्तेस पोषक अशा अनेक दुरुस्त्या व बांधकामे करून ह्या जलदुर्गास बेलाग नि बुलंद बनविले. पुढे पेशवाईत आंग्रे व नंतर धुळूप या सागरी सरदारांचा आश्रयस्थान बनलेला. हा किल्ला देवगड तालुक्यात वाघोटन खाडीच्या तीरावर वसला आहे. विस्तृत क्षेत्रफळाच्या ह्या बलाढ्य दुर्गाला तिहेरी तटबंदी लाभली आहे. २७ बुरूजांच्या ह्या तटबंदीभोवती पाण्याचा मारा चुकवण्यासाठी मोठमोठे धोंडे रचले आहेत. त्यामुळे समुद्राच्या लाटांचा मारा थेट तटबंदीवर होत नाही, व त्याच्याबरोबर साधे होडकेही तटबंदीशी फाजील लगट करण्यास धजावत नाही. तीन बाजूंनी पाणी व एका बाजूने जमीन असलेल्या ह्या किल्ल्याचे प्रवेशद्वार जमिनीकडे असले तरी दर्शनी मात्र नाही. नागमोडी प्रवेशमार्ग व तोही वरच्या

बुरुजांच्या माऱ्यात असल्याने किल्ल्याचा भेद करणे महाकठीण.

जायचे कसे ?

पुण्याहून कोल्हापूर व तेथून विजयदुर्गास एस. टी. जाते. परंतु मुंबईहून विजयदुर्गास जाणे अधिक सोयीचे. मुंबईहून थेट विजयदुर्गास एस.टी. जाते किंवा जलमार्गेदेखील जाता येते. (फक्त काही दिवशीच ह्या बोटी विजयदुर्गास थांबतात.) एस. टी. ने गेल्यास किल्ल्याच्या अगदी पायथ्याशीच उतरता येते.

रचना

तीन प्रवेशद्वारांतून आत गेल्यावर जुन्या इमारतींची डागडुजी करून बनवलेली पोलिसांची निवासस्थाने नजरेस पडतात. रस्त्याच्या दोन्ही अंगास अनेक निकामी तोफगोळे पडलेले आढळतात. तेथून थोड्याशा अंतरावर एक दुमजली व सुस्थितीतील वास्तू आपले लक्ष वेधून घेते. सध्या दुर्गयात्रींचे ते एकमेव निवासस्थान आहे. विस्तृत तळघर असलेल्या या इतिहासकालीन वास्तूवर शासनाचे विश्रामगृह उभारले गेले आहे. अल्पदरात तेथे राहण्याची सोय होऊ शकते. पूर्वी तळघरात कैद्यांना डांबून ठेवीत असत. विश्रामगृहाच्या गच्चीवरून समुद्राचा अथांग परिसर उत्तमरित्या न्याहाळता येतो. या वास्तूशेजारीच एक भला थोरला चिरेबंदी जलाशय आहे. दीर्घकाळच्या दुर्लक्षामुळे ह्या बांधीव तलावात-आता पाण्याचा टिपूसही साठून रहात नाही.

काय हवे ?

तळघरामध्ये मराठी आरमाराची माहिती देणारे नकाशे, तक्ते, थोर थोर दर्यासारंगांची चित्रे, त्यांच्या वापरातील वस्तू, मराठी आरमारात असणाऱ्या गुराब, तरांडी, दुधोली अशा तऱ्हेतऱ्हेच्या

लढाऊ गलबतांची मॉडेल्स, महत्त्वाच्या आरमारी चढायांच्या रोमहर्षक इतिहास, नकाशाच्या सहाय्याने त्यांची माहिती तेथे येणाऱ्या दुर्ग-यात्रिकांस दिल्यास ते एक आकर्षण होईल. जलक्रीडेसाठी या वास्तूनजीकचा रिता जलाशय पाणी साठवून उपयोगात आणता येईल.

संशोधनाची साक्ष

या दुमजली वास्तूसमोरच १८९८ साली लॉकियर या पाश्चात्त्य ज्योतिर्विदाने उभारलेले सिमेंटचे कट्टे याच्या विज्ञानप्रेमाची ग्वाही देतात. विजयदुर्गाहून सूर्यग्रहणाचे वेध चांगल्यारितीने घेता येतील असे कळल्यावरून हा पाश्चात्त्य ज्योतिर्विद चांगला महिनाभर येथे तळ ठोकून राहिला होता. आपल्या दुर्बिणी अन् कॅमेरे रोखून बसलेला हा शास्त्रज्ञ कोणीकडे, अन् नाक धरून पाण्यात बुड्या मारणारे आम्ही भारतीय कोणीकडे. ग्रहणानंद लुटावयास देखील अविरत श्रम करावे लागतात. मगच थोडेफार संशोधनाचे फलित हाती पडते, याची साक्षच हे सिमेंटचे कट्टे देतात. स्पेक्ट्रोस्कोपच्या सहाय्याने मिळालेल्या स्पेक्ट्रोग्राफवरूनच एका मूलतत्त्वाच्या सूर्यावरील अस्तितत्त्वाला ठोस पुरावा मिळाला. त्यामुळे या मूलतत्त्वालाच हेलियम (हेलिऑस म्हणजे सूर्य) हे नाव मिळाले.

गडावर खाडीचे बाजूस असलेला व आता बुजलेला भुयारी मार्ग, उद्ध्वस्त झालेले दारू-कोठार व इतर इमारतींचे भग्नावशेष, अस्ताव्यस्त पडलेल्या तोफा याखेरीज विशेष प्रेक्षणीय असे किल्ल्यावर काहीही नाही. समुद्राकडील बाजूस तटबंदीस एक ५-७ मी. लांबी-रुंदीचे भलेथोरले खिंडार पडले आहे. त्याची वेळीच दुरूस्ती करावयास हवी, नाहीतर सर्वभक्षी समुद्राच्या पोटात हा जलदुर्ग रिचवला जाईल.

ज्वलंत इतिहास

१६९८ मध्ये दर्यासारंग कान्होजी आंग्रे यांनी २५० कि.मी. लांब अन् ५०-६० कि.मी. रुंदीची कोकणपट्टी आपल्या ताब्यात आणली व त्याचे मुख्य ठाणे विजयदुर्गावर ठेवले. १७१७ च्या एप्रिलमध्ये इंग्लिशांनी केलेल्या आरमारी चढाईत आंग्र्यांनी त्यांचा साफ पाडाव केला. पुन्हा १७२० मध्ये वाल्टर ब्राऊनच्या नेतृत्वाखालील पोर्तुगीज व इंग्रजांच्या संयुक्त मोहिमेचाही आंग्र्यांनी धुव्वा उडवला. परंतु त्यात मराठ्यांची १६ लढाऊ जहाजे निकामी झाली. १७२४ मध्ये डचांच्या आरमारासही आंग्र्यांनी पिटाळून लावले. सतत मिळवलेल्या या विजयामुळे आंग्रे उन्मत्त झाले. मराठ्यांच्या केंद्रसत्तेला ते जुमानेनासे झाले. अखेर १७५६ मध्ये पेशवे व इंग्रज यांच्या संयुक्त मोहिमेसमोर आंग्र्यांनी उभारलेल्या आरमाराची राखरांगोळी झाली. १२॥ लाख रुपयांच्या लुटीबरोबरच जेमतेम वर्षभर या किल्ल्याचा ताबा इंग्रजांकडे आला. त्यामुळे नाराज झालेल्या पेशव्यांना इतक्यातच दुखवून चालणार नाही म्हणून १७५७ मध्ये विजयदुर्गाचे स्वामित्त्व पुन्हा पेशव्यांकडे आले. त्यावर आनंदराव धुळुपांची नेमणूक झाली. धुळुपांच्या आरमारानेही पाश्चात्त्यांना त्राही भगवान करून सोडले. अखेरीस १८१८ च्या जूनमध्ये विजयदुर्गावरील मराठ्यांचे स्वामित्व कर्नल इम्लाकने संपुष्टात आणले.

प्रत्येक दुर्ग-यात्रिकाने आवर्जून भेट द्यावी अशी आणखी दोन ठिकाणे किल्ल्याच्या परिसरातच आहेत. पहिले म्हणजे आंग्र्यांनी उभारलेली आरमारी गोदी. खाडी किनाऱ्याला लागून विजयदुर्गाच्याच बाजूला अवघ्या ३ कि.मी. वर ही गोदी आहे. ११० मी. लांब व ७० मी. रुंदीची ही गोदी उत्तराभिमुख आहे. १५० टनी जहाजे यातून सहज ये-जा करीत पण तिची खरी क्षमता ५०० टनी जहाजे पेलण्याइतपत आहे. आजदेखील अगस्ती ड्रेजरला

ही गोदी उपयोगी पडते.

विजयदुर्गाच्याच रस्त्यावर तीन कि.मी. अलीकडे एक देवालय आहे. त्याचे नाव आहे रामेश्वर मंदिर ! त्याची उभारणी नाना फडणीसांचे बंधू गंगाधर भानू यांनी केली. देऊळ अगदी साधे कौलारू आहे. खास कोकणी पद्धतीच्या अनेक दीपमाळा या देवालयासमोरील सभामंडपाचे पुढ्यात उभ्या आहेत. मंदिराचे आवार फरसबंदी असून सभोवताली घनदाट वृक्षराजी आहे. थोड्याशा खोलगट जागी असलेल्या या नयनरम्य स्थानाकडे जाणारा मार्ग १५० मी. लांब व १५ मी. खोल असा दगडातून खोदून काढलेला आहे. मंदिरातील मुख्य गाभाऱ्यात शिवपिंडी आहे व बाहेरील बंदिस्त भागात सुमारे ५० किलो वजनाची शुद्ध चांदीची, नंदीवर आरूढ झालेली व चतुर्भुज शिवाची मूर्ती मोठी प्रासादिक आहे. देवळाच्या उजव्या अंगास आवाराबाहेर आंग्र्यांची एक छत्री व काही सती-शिळा आहेत.

१०. किल्ले सिंधुदुर्ग : (जि. सिंधुदुर्ग)

दुर्गपती शिवरायांच्या स्वराज्याचा विस्तार सह्याद्रीच्या डोंगररांगा ओलांडून सिंधुसागराच्या लाटांपर्यंत जाऊन पोहोचला. महाराष्ट्राच्या त्या भाग्यविधात्याच्या ध्यानी एक गोष्ट आली : 'जसे, ज्यास अश्वबल त्याची पृथ्वी; तसे ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र.' आरमार उभारावयाचे तर जलदुर्गांचे पाठबळ हवे. मालवणजवळचे कुरटे बेट शिवरायांच्या मनी भरले. 'चौऱ्याऐंशी बंदरी ऐसी जागा नाही' हे ध्यानी घेऊन जानभट अभ्यंकरांनी काढून दिलेल्या शुभमुहूर्तावर दि. १० नोव्हेंबर १६६४ रोजी मालवणच्या किनाऱ्यावर श्री विघ्नहर्त्या गणेशाचे पूजन केले व सोन्याचा नारळ सागरास

अर्पण केला. मुरूड जंजीऱ्याचा सिद्दी, मुंबईचे इंग्रज व फिरंगाणातील पोर्तुगीज यांच्या उरावर ही शिवलंका साकार होऊ लागली. एक कोटी होन रिचवून, महाराष्ट्रपुत्रांचा घाम आणि रक्त शिंपून हा जलदुर्गांचा राजा आकारास आला. शिवरायांनी नाव दिले सिंधुदुर्ग ! सिंधुदुर्गाचे गरूड-हनुमंत शोभणारे राजकोट, सर्जेकोट हे उपदुर्गही त्याच सुमारास अस्तित्त्वात आले व त्याबरोबरच सिंधुदुर्गाच्या महाद्वारासमोरील खडकाळ बेटावर पद्मगड उभा राहिला. आरमारी बोटींची बांधणी व दुरुस्ती तेथे होऊ लागली.

मालवण बंदराच्या नैऋत्येस १॥ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या ह्या किल्ल्याचा विस्तार १९ हेक्टर असून घेरही ३-३। किलोमीटर भरेल. समुद्रवलयांकित सिंधुदुर्गाला ४२ बुरूज अंसून तटाची उंची १२ मीटरपर्यंत आहे.

मालवणहून सिंधुदुर्गावर जाण्यास होडीचे सहाय्य घ्यावे लागते. भाडे द्यावे लागते. किल्ल्याच्या पूर्व बाजूस असलेल्या .नागमोडी सागरी रस्त्याचे शेवटी असलेले हे प्रवेशद्वार दर्शनी भागात नाही. शिवराजांच्या प्रगत दुर्गबांधणीची साक्षच हा महादरवाजा देतो. या दाराशीच द्वाररक्षक हनुमंताचे देऊन उजव्या हातास आहे. आत शिरल्यावर लगेचच उंजव्या हातास तटावर दोन देवळ्या आहेत. पैकी घुमटीत डाव्या पायाचा व दुसरीत उजव्या हाताचा ठसा आहे. ते ठसे खुद्द शिवछत्रपतींचे आहेत असे सांगतात. या संदर्भात असे सांगितले जाते की, या दुर्गाची उभारणी चालू असताना स्वत: महाराज त्याची पाहणी करण्यास येत असत. एकदा ते तेथे आले असता तटावर लावलेली चुन्याची लादी ओली होती; त्यावर त्यांचा पाय पडला. तेथे पायाचा ठसा उमटला. पुढे बुरूजावर जाताना मुंढारीचा आधार घेतला. तेही काम ओले असल्याने तेथेही हाताचा ठसा उमटला. तेथे काम करणाऱ्या गवंड्याने त्यावर थापी न फिरविता ते तसेच राहू

दिले. वाळून वज्रलेप झाल्यावर त्यावर त्या दूरदृष्टीच्या शिवप्रेमी गवंड्याने घुमट्या उभारल्या. मात्र आजमितीस चुन्यात उमटलेल्या ह्या ठशांची म्हणावी तितकी काळजी घेतली जात नाही.

महादरवाज्यातून श्रीशिवराजेश्वर मंदिराकडे जाऊ लागले की, डाव्या हातस एक निसर्गचमत्कार दिसतो. नारळांच्या झाडावळीत दोन शेंडे असणारे म्हणजे फांदी फुटलेले नारळाचे झाडे आहे. किल्ल्यात मध्यभागी छत्रपती राजाराम महाराजांनी बांधलेले शिवाजी मंदिर आहे. त्यातील मूर्ती वीरासन घालून बसलेली, हातापायांत तोडे घातलेली, तुमान ल्यायलेली, नावाड्यांच्या टोपीसारखे शिरस्त्राण घातलेली, दाढी नसलेली अशी आहे. मूर्तीस सोन्याचांदीचा मुखवटा लावून, कोल्हापूरकर छत्रपतींकडून आलेला पोशाख चढवून, दागदागिने घालून श्री.सपकाळ पुजारी मोठ्या भक्तिभावाने रोज पूजा-अर्चा करतात. शिवजयंती, रामनवमी, नवरात्र असे उत्सवही होतात. तेव्हा पालखी निघते. मूळ शिवाजीमंदीर, ५ x ७ मीटर असून त्यापुढील सभामंडप कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी १९०७ साली उभारला. गडावर या मंदिराखेरीज महादेवाचे, भगवतीदेवीचे, महापुरूषाचे, जरीमरीचे व द्वाररक्षक हनुमंताचे अशी ५ देवळे आहेत. शिवाजी मंदिरात बीजमंत्राने भारलेली व स्वत: शिवाजी महाराज वापरत असलेली अशी एक तलवार म्यान केलेल्या स्थितीत आहे.

सभोवती जरी समुद्राचे खारे पाणी असले तरी दुर्गातील विहिरीचे पाणी मात्र गोडे आहे. शिवाजीराजांनी विहिरींची नावे ठेवली दूधबांव, दहीबांव व साखरबांव. बांव म्हणजे विहीर. याखेरीज शिवमंदिराखालील विहीर व साठवणीच्या पाण्याचा तलाव किल्ल्यावर आहे.

किल्ल्याच्या तटबंदीवरून दुर्गप्रदक्षिणा करताना काही गोष्टी ठळकपणे नजरेस पडतात. पहिली म्हणजे तटाच्या पायातील

चिऱ्यांमधील फटी रुंदावत आहेत. समुद्राच्या लाटांमुळे होणाऱ्या झीजेपेक्षा तेथील कोळ्याचे प्रयत्न यास जास्त कारणीभूत आहेत. मासेमारी करण्यास आवश्यक असणाऱ्या जाळ्यास अडकवण्यास शिशाच्या गोळ्या लागतात. दोन दगडांमध्ये उकरले की शिसे सापडते, कारण तटाच्या बांधकामाचा पाया शिशाचा रस ओतून पक्का केला आहे. असे विपुल व सहजसाध्य शिसे उपलब्ध असताना विकत घेण्याचे कष्ट कोण करणार? पण आपल्या बापजाद्यांनी एकेक चिरा बसवताना घाम गाळला आहे व त्याच्या रक्षणासाठी रक्ताचा सडा शिंपला आहे आणि आपण दीडदमडीच्या शिशासाठी ह्या बुलंद नि बेलाग जलदुर्गाचा विध्वंस करतोय आणि परस्थ मंडळी तो नाश उघड्या डोळ्याने बघाताहेत. यास वेळीच आवर घालायला हवा, नाहीतर हा जंजीऱ्यांचा राजा नामशेष होईल. याखेरीज किल्ल्याच्या उत्तर अंगास व पश्चिमेस तट-बुरूज ढासळून खिंडारे पडू लागली आहेत. त्यातून भरतीचे वेळी पाणी धडका मारून आत शिरते. त्याच्या पुनर्बांधणीची नितांत आवश्यकता आहे.

तटबंदीवरून चक्कर मारताना खाली किल्ल्यात उतरण्यासाठी ४५ ठिकाणी दगडी जिने आहेत. मात्र पायऱ्या फार अरुंद आणि कठडा नसल्याने फार सावधगिरीने उतरावे लागते. याखेरीज तटामध्येच शिवकालीन पण आजही उपयोगात आणता येतील असे अनेक शौचकूप आहेत. मळ वाहून जाण्यास योग्य तो उतार दिलेले, बंदिस्त असे हे शौचकूप म्हणजे शिवकाली सार्वजनिक आरोग्याची काळजी घेत असल्याची खूणच होय.

दक्षिणेकडच्या तटामधून बुटकीशी वाट बाहेर पडते. तेथे चंद्राकृती व मऊ मऊ रेतीची छोटेखानी पुळण आहे. त्याला म्हणतात,'राणीची वेळा' म्हणजे राणीच्या समुद्रस्नानाची जागा. करवीर गादीच्या संस्थापिका ताराराणी या दुर्गात रहात असताना

त्या तेथे समुद्रस्नानास येत असत.

याखेरीज महादरवाज्यावरील मोडकळीस आलेला नगारखाना, भगवतीदेवीच्या मंदिरामागे असलेला दर्याबुरूज ऊर्फ टेहळणी बुरूज, राजवाड्याचे अवशेष अशा अनेक प्रेक्षणीय वास्तू किल्ल्यावर आहेत. संकपाळ हे शिवाजी मंदिरातील पुजारी, पुराणवस्तुसंशोधन खात्याचे चौकीदार व आणखीही ५-६ कुटुंबे गडावर रहातात. गडकऱ्यांच्या मुलाबाळांसाठी एक प्राथमिक शाळाही शिवाजीमंदिराजवळ भरते.

सिंधुदुर्गाची दुर्दशा थांबविण्यासाठी काही प्रयत्न अवश्य केले पाहिजेत, असे तेथे जाणाऱ्या प्रत्येक पर्यटकास वाटते. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाने तेथे काही लक्ष रूपये खर्च करून या स्थानाचा पर्यटन आकर्षण केंद्र म्हणून विकासही करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी काही गोष्टी विचारात घेणे आवश्यक वाटते.

मालवणला अल्पखर्चात उतरता येण्याजोगे निवासस्थान नाही. तेथील इतिहास व भूगोल माहिती असलेले खात्रीशीर वाटाडे नाहीत. किल्ल्यावर मुक्काम करण्यास योग्य वास्तू नाहीत.

मालवणहून सिंधुदुर्गावर जाण्यास भक्कम पूल अगर कमी भाड्यात होड्या उपलब्ध होणे जरुरीचे आहे. जंजीऱ्याचा राजा शोभणाऱ्या व शिवकालीन बलाढ्य आरमारी सत्तेचा केंद्रबिंदू असणाऱ्या या किल्ल्यावर मराठी आरमाराची माहिती देणारे नकाशे, मॉडेल्स, छायाचित्रे यांनी सुसज्ज असलेले संग्रहालय उभारणे उचित ठरेल. सागरसंपत्तीची माहिती देणारे जलजीवालय, सागरी अन्नाची उपलब्धता असणारे उपहागृह, खास कोकणी मेव्याचे रास्त दराचे विक्री केंद्र, नारळाच्या करवंट्या, काथ्या, शंख-शिंपले यांनी केलेल्या आकर्षक वस्तूंचे विक्री केंद्र, समुद्र उद्यान, समुद्र पर्यटन असे अनेक उपक्रम अशा ठिकाणी हाती घेता येतील. त्यातून मिळणाऱ्या

लाभांशातून दैनंदिन साफसफाईची रक्कम सहज उभी करता येईल.

शिवाजी महाराजांनी घाम गाळून, अमाप पैसा खर्चून उभारलेले अन् मराठेशाहीतील पराक्रमी सरदारांनी रक्ताचा सडा शिंपडून जोपासलेले हे क्रांतिपुष्प आपणास टिकविता येऊ नये यापरते दुर्दैव कोणते? मालवण-सिंधुदुर्ग केंद्र धरून देवगड ते वेंगुर्ले या परिसरात आता हिंदुस्थानातील पहिले मरीनपार्क साकारणार आहे. राजा शिवाजी सागरी उद्यान असे त्याचे नामकरण होणे अगत्याचे आहे.

मालवणकडून धक्क्याकडे जाताना उजवीकडे आहे तो राजकोट, शिवाय मालवण अन् सिंधुदुर्गाच्या मधोमध उभा आहे पद्मगड. या ठिकाणी तटबंदीच्या आत एक वेताळाचे मंदिर व शिवकालीन आरमाराची दुरुस्ती करण्यास उपयोगी पडणारी एक गोदी आहे. मालवण शहराच्या उत्तरेस १-१॥ कि.मी. अंतरावर कोळंब खाडीच्या पलिकडे रेवंडी गावाच्या हद्दीत खाडीच्या तोंडाशी सर्जेकोट हा उपदुर्ग आहे. खंदक व समुद्राने हा पूर्णपणे वेढलेला होता.

११. सुवर्णदुर्ग-कनकदुर्ग-फत्तेगड अन् गोवा किल्ला : (जि. रत्नागिरी)

कोकणच्या किनाऱ्यावर असणारे वसई, कुलाबा, खांदेरी, जंजीरा, रत्नागिरी, विजयदुर्ग, देवगड, सिंधुदुर्ग, आग्वाद, खोलगड, सदाशिवगड, अंजदीव असे किल्ले बरेच परिचित आहेत. पण कल्याणच्या खाडीत जन्मलेल्या मराठी आरमाराची इतिश्री पाहणारा सुवर्णदुर्ग काही फारसा परिचित नाही. खेड-दापोलीजवळचे हर्णै-मुरूड थोडेफार ऐकून माहिती असणार. या हर्णैच्या पुढ्यात समुद्राकाठी किनारा किल्ल्यांचे एक त्रिकूट आहे. कनकदुर्ग, फत्तेगड अन्

गोवा किल्ला (गोमंतकाशी याचा काहीही संबंध नाही.) शिवाय आत समुद्रात एका बेटावर एक जंजीरा आहे. तोच सुवर्णदुर्ग. पण मुळातच फारशी प्रसिद्धी नाही अन् हर्णैसारख्या छोट्या आडगावात चहा-फराळ, भोजन-निवासाची काहीच सोय नाही. त्यामुळे या दुर्गचौकडीची फारशी विचारपूस करायला कोणी जात नाही.

पण खेडच्या स्टँडलगतची लेणी पाहून दापोलीच्या रस्त्याला लागलं की, उन्हवरे गावची गरम पाण्याची कुंडे अनुभवून, मग दापोलीला उतरावं. हवं तर कोकण कृषी विद्यापीठाचा हिरवा संसार पहावा अन् मग तमाम दाते व बेडेकरांच्या मूळ गावी करजगावला जाऊन तिथला जानेश्वर अन् त्याच रावळातला देखणा गणपती पहावा. तिथल्या वसंतराव बेडेकरांकडे राम राम, शाम शाम करून मग आसूदला श्री व्याघ्रेश्वर अन् केशवराजाचं दर्शन घ्यावं. मग आसूद पुलाशी डावीकडे वळून महर्षी अण्णासाहेब कर्व्यांच्या मुरूड गावाला जाऊन, तिथली रम्य पुळण पहावी. या चौपाटीवर निसर्गाशी एकरूप होऊन भटकंती स्मरावी. उजवीकडच्या हर्णैच्या किल्ल्यांची हाक ऐकून तिकडे धाव घ्यावी. आता श्री. गोळे यांच्याशी आधी पत्रव्यवहार करून, आपल्या निवासाची अन् त्यांच्यामार्फत गावातील कोणाकडे भोजनाची व्यवस्था करून घेण्याची उत्तम सोय झाली आहे. सहज फिरायला म्हणून बंदरावर जावं. तर पाणशेंगांच्या बाजारातून नाकाला रुमाल लावीत समुद्रकाठावरच्या किनारी दुर्गत्रयीकडे यावे. पहिलाच भेटतो तो गोवा किल्ला. विस्तारानं मोठा. फक्त इतिहासाबद्दल मुग्ध.

१८६२ च्या पाहणीत चांगल्या अवस्थेत असणारा अन् ६९ जुन्या तोफा धारण करणाऱ्या या किल्ल्याचे हे ओसाड-उजाड रूप पाहून वाईट वाटते. अर्थात जिथे राजगड-रायगडाची रया गेली तिथे अशा कमी महत्त्वाच्या किल्ल्यांचे काय? इथला भूदरवाजा

सोडला तर आणखी एक दरवाजा आहे. या समुद्रदिशेच्या महादरवाजातून आता आत शिरताच येत नाही. चिणून तो बंद केला आहे. कुणी ? का ? ....कोणास ठाऊक ?

या चिणलेल्या महादरवाज्याच्या बाह्यदर्शनी भागावर असणारे डावीकडचे गंडभेरूंड व त्याने धरलेले गजराज पाहण्यासारखे आहेत. उजवीकडे मात्र एकमेकांच्या सोंड्या-शेपट्या पकडून ठेवल्या आहेत. तर उजवीकडच्या तटात द्वाररक्षक हनुमानाची घुमटी आहे. किल्ल्यात साचपाण्याचा एक हौद आहे. पूर्वी याच किल्ल्यात रत्नागिरीचे जिल्हाधिकारी उतरून मुक्काम करीत असत. त्या वास्तूचे भग्नावशेष आढळतात. या किल्ल्याच्या दक्षिण भागात एक बालेकिल्ला आहे.

फत्तेगड या किल्ल्याच्या उंचवट्यावर कोळी मंडळींनी आपली घरे उभारली आहेत. त्यामुळे किल्लेपणाचे कोणतेही अवशेष त्यावर आढळत नाहीत. समुद्राच्या दिशेला असणारे भिंतीसारखे उर्वरित बांधकाम एवढीच काय ती किल्लेपणाची खूण. याचे क्षेत्रफळ पाऊण हेक्टर आहे.

कनकदुर्ग हा समुद्रात घुसलेल्या एका प्रचंड कातळाच्या माथ्यावर उभारलेला छोटेखानी किल्ला. तिथवर जायला उत्तम सेतू आहे. सध्या किल्ल्यावर दीपगृह आहे. पाण्याच्या जुन्या टाक्यांचे दर्शन होते. मात्र त्यात सध्या पाणी नाही. या किल्ल्याला खेटूनच सध्याचे बंदर किंवा धक्का आहे. कनकदुर्गाचे क्षेत्रफळच ५ हेक्टर आहे.

कनकदुर्ग व फत्तेगडाची उभारणी कोणी व केव्हा केली याबाबत मतभेद आहेत. पण त्यांची निर्मिती शिवकालानंतरची असावी असं बहुतेक तज्ज्ञ मानतात.

सुवर्णदुर्गावर जायचे तर होडीची आवश्यकता भासते. जंजीरा, अर्नाळा, सिंधुदुर्गाप्रमाणे येथे नियमित वाहतूक व्यवस्था नाही.

पण तेथील कोळ्यांच्या मदतीने होडी मिळू शकते. किल्ल्याचे दार लपवून बांधलेले आहे. त्यामुळे हा किल्ला, किमान दार, शिवनिर्मित असावे. पूर्व दिशेस असणारे याचे दार उत्तराभिमुख आहे. तेथे पुळण आहे.

सुवर्णदुर्ग-कनकदुर्ग-फत्तेगड-गोवा किल्ल्याच्या भोवतालीचा कातळ अतिशय सपाट आहे. समुद्रपातळीच्या किंचित् वर पण मुद्दाम कोबा करावा असा छिन्नून घेतलेला आढळतो. ही गोष्ट मानवनिर्मित, की नैसर्गिक, याचा उलगडा होत नाही. कोणत्याही अन्य सागरी किल्ल्यांशी असा प्रकार आढळत नाही. याचे नेमके प्रयोजनही ध्यानी येत नाही.

काही अभ्यासकांच्या मते शिलाहारांनी उभारलेल्या या किल्ल्याचा ताबा विजापूरकरांकडून शिवरायांकडे आला. १६६० च्या सुमारास ही घटना घडली मुख्य दरवाज्यात उंबऱ्याअलिकडील पायरीवर कासव आणि उजव्या भिंतीवर हनुमान शिल्प कोरले आहे. किल्ल्यात वड व बोरीची काटेरी झाडावळ प्रचंड माजली आहे. पण किल्ल्यात खूप बांधकामे व पाण्याची व्यवस्था एकेकाळी असावी. मात्र किल्ल्यात एखादेसुद्धा मंदिर आढळत नाही, ही आश्चर्याची गोष्ट वाटते.

सुवर्ण दुर्गावरील किल्लेदाराच्या फितुरीचे प्रसंगी, ऐन धामधुमीच्या काळात कान्होजी आंग्र्यांनी केलेली चतुराई राजारामांच्या ध्यानी आली व कान्होजींचा उदय झाला. अवघे कोकण आलमगिरी वावटळीत 'समुद्रावरच्या या शिवाजीने' नेटके राखले. पुढे ताराबाईच्या पक्षातून शाहू पक्षाला जाणे व त्यात श्रीवर्धनच्या कर्तबगार बाळाजी विश्वनाथ पेशव्याने आपली मुत्सद्देगिरी दाखविणे ह्या दूरगामी परिणाम करणाऱ्या घटना ठरल्या.

रामराजांच्या काळात सरखेल आंग्र खुद्द पेशव्यांना जुमानीत नाहीसे झाले. कोल्हापूरकरांची फूस मिळाल्याने परकीय सत्तांशी

हातमिळवणी करून स्वराज्याच्या नरडीला नख लावण्याचा मनसुबा तुळाजी आंग्र्याने रचला. त्यामुळे या उद्दाम पुंडाईचा बंदोबस्त करणे अगत्याचे झाले. नानासाहेब पेशव्याने इंग्रजांच्या मदतीने आंग्र्यांचे आरमार सुवर्णदुर्ग परिसरातच नष्ट केले. नव्हे, त्यांना ते नष्ट करावे लागले. हे बरोबर का चूक? याचे परिणाम? पण तरीही नंतर धुळुपांना पुढे आणून आंग्र्यांची जागा भरून काढण्याचे प्रयत्न झालेच. जे घडलं ते असं. त्याची जाणीव तत्कालीन मुत्सद्द्यांना होती की नव्हती कोण जाणे? पण या साऱ्याच गोष्टींमुळे मराठ्यांच्या नौदल सामर्थ्याला तडा गेला व त्याचा फायदा मुंबईकर इंग्रज व थोड्याफार प्रमाणात जंजीरेकर सिद्दींना मिळालाच.

खेड, दापोली, हर्णै, दाभोळ, बाणकोट, वेळास या मुलखात इतिहास घडवणारी, भाविकांनी नतमस्तक व्हावे अशी अन् निसर्गसमृद्ध-देखणी असंख्य ठिकाणं आहेत. तिथे जाऊन ती पहावीत. आपले पर्यटन हे असे व्हायला हवे पण प्रत्यक्षात जाणत्या वयातील मंडळींच्या सहली म्हणजे खाणं-पिणं अन् धूर सोडणं, अचकट विचकट बोलणी अन् स्टिरीओच्या आवाजावर ताल धरून नाचणं यापरतं काही नाही. अशा इंडियन टूरिस्टना मग भारतीय ग्रामीण जीवनाची जवळीक कशी वाटावी? त्या खेडवळ, साध्या ग्रामस्थांनी तरी अशा हिडीस लोकांना थारा कशाला द्यावा? पण ही स्थळं पहायला, तिथला अभ्यास करायला तुम्ही गेलात तर मात्र तुमचं स्वागत अन् आतिथ्य भरपूर होतं.

१२. दुर्गदुर्गेश्वर शिवतीर्थ रायगड : (जि. रायगड)

तीन एप्रिल १६८०, चैत्र शुद्ध पौर्णिमा, हनुमान जयंती,

शके १६०२, रुद्रनाम संवत्सरे, शनिवार या दिवशी महाराष्ट्राचा लाडका राजा परलोकवासी झाला.

'ते दिवशी पृथ्वीकंप जाहला. गगनी धूमकेक उदेला. उल्कापात आकाशाहून जाला. रात्री जोड इंद्रधनुष्ये निघाली. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्रीशंभूमहादेव तळ्याचे उदक रक्तांब्बर जाले.' असे सभासदाने नोंदले आहे.

महाराष्ट्राच्या भूगोलाला इतिहास मिळवून देणारा क्षण जिथे अवतरला तो हा रायगड. दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो अशा प्रबळ मानल्या गेलेल्या दिल्लिंद्राच्या सिंहासनाला हादरे देणारा वीराग्रणी शिवराय जिथे नांदला तो हा रायगड. महाराष्ट्र वसुंधरेचा पहिला छत्रपती जिथे सिंहासनाधिष्ठित झाला, ते सुदर्शन मंगलस्थळ म्हणजे 'राजधानी रायगड !'

तणस, रासिवटा, नंदादीप, रायरी अशा अनेक नावांनी ओळखल्या जाणाऱ्या रायगिरीला एका जुजबी डोंगरी ठाण्याव्यतिरिक्त फारसे महत्त्व नव्हते. पण जावळीकर चंद्रराव मोऱ्यांचा शिवाजीराजांनी १६५६ मध्ये पराभव केला आणि रायरी, वासोटा, भोरप्याचा डोंगर अशी बळवंत स्थाने हिंदवी स्वराज्यात दाखल झाली.

स्वराज्याच्या सीमा विस्तारत गेल्या. उदंड राजकारणे झाली अन् पठारी भागातील आटोपशीर राजधानी राजगडावरून हलविण्याची निकड भासू लागली. राजगडाच्या पश्चिमेस असणाऱ्या रायरीची निवड महाराजांनी तिथं जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून केली. त्याबाबत लिहिताना सभासद म्हणतो, 'राजा खासा जाऊन पाहता गड बहुत चखोट. चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणे. दीड गाव उंच. पर्जन्यकाळी कडियावर गवत उगवत नाही आणि धोंडा तासीव एकच आहे. दौलताबादचे (देवगिरीचे) दशगुणी उंच, असे देखोने संतुष्ट जाले आणि बोलिले तक्तास जागा हाच गड करावा.'

जगदीश्वराचा शिलालेख.


नवी राजधानी बसवायची तर या बुलंद, बेलाग नि दुर्गम दुर्गाला तटबंदीचं पागोटं तर हवंच. पण वाडे, हुडे, प्रासाद, देवालये, जलाशय, महादरवाजा, चोरदरवाजे, असं सगळं सगळं नीटनेटकं, सालंकृतच हवं. हिरोजी इंदुलकरांच्या निपुण मार्गदर्शनाखाली हे बांधकाम उभं राहू लागलं. या साऱ्यांची हकीगत आपणास श्रीजगदीश्वराच्या (खरंतर श्रीवाडेश्वराच्या) जवळील शिलालेखातून मिळते, तो शिलालेख असा :


॥श्रीगणपतयेनम:॥

॥ प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानंददोनु
॥ ज्ञया श्रीमच्छत्रपते शिवस्यनृपते: सिंहासने तिष्ठत: ॥
॥ शाके षण्नव् बाणभुमिगणनादानंद संवत्सरे ज्योतिराज
॥ मुहूर्त कीर्तिमहिते शुक्लेश साप्र्ये तिथौ ॥१॥
वापीकूपतडागराजिरू
चिरै हर्म्यै र्वनंवी थिको स्तंभै: कुंभिगृहै नरेंद्रसदनैभ्रंलिहै
॥ र्मीहिते श्रीमद्रायगिरौ गिरामविषये हीराजिना निर्मितो
॥ यावचंद्र दिवाकरौ विलसतस्तावत्समुज्ञृंभते ॥२॥

म्हणजे सर्व जगाला आनंददायी असा हा जगदीश्वराचा प्रासाद सिंहासनाधीश्वर श्रीमद्छत्रपती शिवाजी राजा यांच्या आज्ञेने शके १५९६ मध्ये आनंदनाम संवत्सर चालू असताना सुमुहूर्तावर निर्माण केला. या श्रीमद् रायगडावर हिराजी नावाच्या शिल्पकाराने विहीरी, तळी, घरे, बागा, रस्ते, स्तंभ, गजशाळा, उंच राजगृहे अशांची उभारणी केली आहे, ती चंद्रसूर्य असेतोवर खुशाल नांदो.

तसे पाहिले तर सह्यपुत्र दुर्गपती तर होतेच, पण किल्ल्यावर जन्मलेला, किल्ल्यावर वाढलेला, किल्ल्यांवरून रणकारणे, राजकारणे, धर्मकारणे, केलेला हा थोर पुरूष आजारी असतानाही किल्ल्यांवरच


प्र.क्र.
राजवाडा
कोळंब तलाव
धर्मशाळा
प्रतापगड
मकरंदगड
वासोटा



विश्रांती घेता झाला. अशा राजाचा राज्याभिषेक एखाद्या गडावरच होणे संयुक्तिक होते. पण त्यांनी चिरनिद्राही एका गडावरच घ्यावी हा मात्र विचित्र योगायोग आहे.

शिवरायांच्या हातापायाचे ठसे शिवलंका सिंधुदुर्गाने मोठ्या अभिमानाने जपले आहेत, तर राजांच्या जडदेहाचा भस्मीभूत अवशेष रायगडावर आहे. श्री जगदीश्वराच्या पूर्वेस प्राकारालगतच राजांच्या दहनस्थानी अष्टपैलू चिरेबंदी चौथरा बांधला गेला. त्या चौथऱ्यावरच लोकमान्य टिळकांच्या पुढकाराने इ.स. १९२६ मध्ये छत्री उभारण्यात आली.

रायगड हा दुर्ग बुलंद नि बेलाग तर खराच, पण उंचीनं थोटका ! अवघी पावणेनऊशे मीटर्स उंचीच काय ती त्याला लाभली आहे. पण येथून पूर्वेकडचे लिंगाणा, रायगड, तोरणा दिसतात तर दक्षिणेकडचे प्रतापगड, मकरंदगडही दिसतात. नैऋत्येकडे सोनगड व कांगोरी ऊर्फ मंगळगडचा माथाही दिसतो.

इ.स. १९७४ मध्ये साजऱ्या झालेल्या श्रीछत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक त्रिशतसांवत्सरी महोत्सवामुळे अनेक जणांना रायगडदर्शनाची उत्सुकता निर्माण झाली. रायगडावर लिहिलेली पुस्तके, पुस्तिका, लेख, भाषणे इत्यादींमुळे रायगडासंबंधी थोडीबहुत माहिती सर्वांना झाली आहे. १९८० सालचा ३०० वा पुण्यतिथी उत्सव व १९८५ मधील मेघडंबरी अनावरण सोहळा, तसेच सातत्याने दरवर्षी चैत्री पौर्णिमेला साजरा होणारा शिवपुण्यतिथी कार्यक्रम यामुळे अनेकांची उत्सुकता चाळवली गेली आहे.

विविध वस्तू

भवानी टोक, श्रीगोंदे टोक, हिरकणी टोक, टकमक टोक, महादरवाजा, नाना दरवाजा, वाघ दरवाजा, चोर दरवाजे, पालखी दरवाजा, मेणा दरवाजा, गंगासागर, कुशावर्ता तलाव, कोळिंब

तलाव, असंख्य टाकी, बालेकिल्ला, नजीकचे स्तंभ, राजांचा राहता वाडा, शिवसिंहासनाची जागा, येथील मेघडंबरी, राजदरबार दालन, नगारखाना, हत्तीखाना, मदारशाची कबर, काशीबाईसाहेबांचे वृंदावन, मोरोपंत पिंगळे स्मारक, शिवस्मारक, सोयराबाईसाहेबांचे वृंदावन, श्री जगदीश्वर ऊर्फ वाडेश्वराचा प्रासाद, कुशावर्तावरील श्रीरामेश्वर, आई शिर्काईचे मंदीर, श्री भवानीची गुहा, शिवाजी महाराजांचा होळीच्या माळावरचा पुतळा असे बरचे काही गडावर पाहण्यासारखे आहे. तर चित दरवाज्याजवळील खूबलढाबुरूजासमोरील वाघबीळ ही सुंदर गुहा, पाचाडमधील राजमाता जिजाबाईसाहेबांचे वृंदावन, वाळणकोंडीचा डोह व त्यातले मासे, सह्याद्रिच्या मुख्य रांगेतला कोकणदिवा, लिंगाणा-राजगड-तोरणा हे किल्ले, देशावरून कोकणात उतरणाऱ्या बोचे घोळीची नाळ, सिंगापूरची नाळ, बोराड्याची नाळ, फडताडाची नाळ अशा अनेक वाटा, कावल्याबावल्याची खिंड, शेवत्या घाट, मढे घाट या वाटाही साहसी पदभ्रमणप्रेमींना नेहमीच आकर्षित करतात.

हिरकणीची गोष्ट, टकमक टोकावरून छत्रीच्या सहाय्याने निजामपूरला उतरल्याची गोष्ट. राजाराममहाराजांचे वाघ दरवाज्यातून पलायन, या साऱ्या कथा आपणास शिवकालात घेऊन जातात. शिवशाहीचे हे सोनेरी क्षण अनुभवण्यासाठी रायगडावर जाऊन रहायलाच हवे. निवासस्थानांची वाढती सोय व देशमुखांचे रुचकर आतिथ्यशील स्वागत यामुळे इथले वास्तव्य सुसह्य होते.

गिर्यारोहकांचे आकर्षण

महाराष्ट्राच्या पर्यटन नकाशावर 'रायगड' हे रांगडे स्थळ आता ठळकपणे दिसू लागले आहे. शिवप्रेमी व दुर्गप्रेमी तर तिथे जातातच, पण 'ट्रेकिंग' ची आवड असणारे गिर्यारोहक देखील तिथे गर्दी करतात. शाळा-कॉलेजांच्या सहलीही आता

येथे येऊ लागल्या आहेत. शे-पाचशे माणसे रात्री मुक्कामाला असणे ही आता नित्याची बाब झाली आहे. या साऱ्या यात्रिकांना काही अडचणी येतात. पूर्वी (इ.स. १९७४ च्या महोत्सवाआधी) रायगडावर जाणाऱ्यांना यापेक्षा अडचणी येत होत्या. परंतु शिवरायांसारख्या राष्ट्रपुरुषाच्या स्मारकाला वंदन करण्यास जेथे शेकडो लोक प्रत्यही येतात, त्यांच्या अडचणी दूर केल्याच पाहिजेत. रायगडाच्या परिसराचे वर्णन स्वत: शिवाजीमहाराज करतात ते असे : ''आमच्या या दुर्गम परिसरात नुसता कल्पनेचा घोडासुद्धा नाचवणे कठीण आहे. मग तो काबीज करण्याची गोष्ट कशाला. येथे पाऊस तर इतका की, उडत्या पाखराच्या पंखावरही शेवाळे उगवेल.''

परंतु डोंगरी ठिकाण, जास्त पाऊस व त्यामानाने कमी झाडी या वैगुण्यावर मात करणे कठीण नाही. महाराष्ट्राच्या पर्यटन विकासाची धुरा बाळगणाऱ्यांनी रायगडाचा पर्यटन विकास साधताना खालील बाबींचा विचार केल्यास अत्यंत उपयुक्त ठरेल.

रायगड हा तसा उपेक्षित, दुर्लक्षित गड. एका कोपऱ्यात वसलेला. दुर्गम प्रदेशाचा स्वामी. १९७४ सालचा समारंभ व १९८० मधील उत्सव यामुळे अधिकाधिक लोकांचे लक्ष इकडे वेधले जात आहे. गडावर सध्या उपलब्ध असलेली भोजन व निवास व्यवस्था, पाहण्यासारखे बरेच काही. इ. मुळे रायगड हे पर्यटन केंद्र होऊ लागले आहे.

सध्या उपलब्ध असलेल्या सोयी आता अपुऱ्या पडत आहेत. परंतु त्याचबरोबर शेकडो लोक रायगडावर प्रत्यही जात आहेत. हे शिवतीर्थ आता पर्यटन स्थळ झालेच आहे. शिवशाहीचा हा मानबिंदू महाराष्ट्राच्या पर्यटन नकाशावर तळपतो आहे. येथे आता जुजबी, तात्पुरत्या सोयी करून भागणार नाही. या शिवदुर्गावर पद्धतशीर प्रयत्न करून काही सोयी-सुविधा उपलब्ध केल्या पाहिजेत.

त्याच्या पर्यटन विकासाचा एक आराखडा करून त्या दृष्टीने प्रयत्न व्हावयास हवेत. त्याचा मास्टर प्लॅन बनवून तो आमलात आणायला हवा.

प्रवाशांच्या सोयी

रायगडावर येणाऱ्यांचे दोन प्रमुख गट पाडता येतात. पहिला एस.टी.ने येऊन रायगडावर जाणारा. दुसरा पायी रायगडावर येणाऱ्यांचा. मुंबई-रायगड, पुणे-रायगड, महाड-रायगड, कोल्हापूर-रायगड गाड्या सध्या अस्तित्त्वात आहेत. जाताना रिझर्व्हेशन मिळते. पण गड पाहून खाली येऊन परतीच्या प्रवासात जागेची शाश्वती नसते. गटाने येणाऱ्या तरूणांना जागा मिळण्यात अडचण पडत नाही. पण वयस्कर, मुले, बायका यांना ही गैरसोय फार जाणवते. तेव्हा किमान मुंबई व पुणे येथे परतीचे रिझर्व्हेशन देण्यात यावे. या सर्व गाड्यांचे जाण्या-येण्याचे वेळापत्रक खूबलढा बुरूजाशी व रायगडावरील निवासस्थानांशी लावले पाहिजे.

दुसरा गट पायी येणाऱ्यांचा आहे. मुळशी, वरसगाव, पानशेत या धरणाच्या जलाशयातून वा राजगड, तोरणा, कुर्डू ऊर्फ विश्रामगडाहून रायगडापर्यंत 'ट्रेकर्स' नेहमी जातात. कावल्या घाट, शेवत्या घाट या व अशाच अनेक जुन्या पायवाटांचा उपयोग करून हे लोक खाली कोकणात उतरतात. खानू, राजदंड, कोकणदिवा आदि ठिकाणावरून रायगडाचे दर्शन फार सुरेख होते. येथील कच्च्या पायवाटांवरून चुकायला होते व त्यामुळे वेळ वाया जातो. जानेवारी-फेब्रुवारीनंतर येथे पाणीही मिळत नाही. थोडे प्रयत्न केले तर या अडचणी सहज दूर करता येतील. या परिसराचे 'ट्रेकिंग मॅप्स्' उपलब्ध करून देणेही शक्य आहे. नव्हे, ते आवश्यक आहे.

पाणीव्यवस्था

खूबलढा बुरूजाशी, वाटेत व महादरवाजापाशी पाण्याची सोय केली पाहिजे. तसेच गडावर टकमक टोक, भवानी टोक आदि ठिकाणी पाण्याची कमतरता असते. तेव्हा वाटेतील टाक्याजवळ तशा अर्थाचे फलक लावले तर लोकांना त्याची कल्पना येऊन ते पाण्याची सोय करून घेतील.

गंगासागर, कुशावर्त, कोळिंब तलाव, हिरकणीजवळील मोठा तलाव, बारा टाकी, काळा हौद या साऱ्या तलावांची व अन्यही सर्व छोट्या-मोठ्या टाक्यांची गळती थांबवली पाहिजे. त्यातील गाळ काढला पाहिजे. त्यात वाढणारे शेवाळे नाहिसे केले पाहिजे. 'उदंड झाले पाणी' अशी स्थिती करायला पाहिजे. बारा महिने हे पाणी मिळेल असे बघावयास पाहिजे.

पर्यटनस्थळी जाणाऱ्यांना सगळी माहिती असतेच असे नाही. फार तर जुजबी माहिती असते इतकेच. बारकावे माहिती नसतात. त्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत रायगडाची माहिती देणाऱ्या अल्पमोली पुस्तिका उपलब्ध केल्या पाहिजेत. त्या सचित्र असाव्यात.

रायगडाची माहिती देणाऱ्या रंगीत स्लाईडस् व फिल्म काढून नव्याने बांधलेल्या निवासस्थानातील सभागृहात रोज ठराविक वेळी त्या दाखविण्याची सोय करणे कठीण नाही. गडावर वीज आहे, सभागृह आहे. मात्र त्या स्लाईडस् व चित्रपटाला ओघवते, माहितीपूर्ण, रसाळ वर्णन ध्वनीमुद्रित करून ठेवायला हवे. ध्वनी-प्रकाश योजनेसारखी खर्चिक व्यवस्था करण्याचे भरीस आत्ताच पडू नये, ती पुढची पायरी आहे.

नगारखान्यावरून लिंगाणा, तोरणा, राजगड, प्रतापगड, मकरंदगड इ. किल्ले दिसतात. त्याची दुर्गयात्रींना कल्पना नसते पण नगारखान्यावर आसपासच्या डोंगररांगेचे चित्र काढून नेमका किल्ला कोणता हे दाखविले तर ते बरे होईल. किल्ला दाखवणारे

वाटाडे मार्गदर्शकही उपलब्ध व्हावेत.

निवास–व्यवस्था.

गडावर सध्या असलेली निवासस्थाने त्वरित उपलब्ध करून दिली म्हणजे ही गैरसोय दूर करता येईल. तेथे पाण्याची सोय केली पाहिजे. पाचाडातही अशी निवासव्यवस्था करता येण्याची शक्यता अजमावून पाहावयास हवी.

या निवासस्थानात कड्या, कोयंडे, नट-बोल्ट, खिडक्या-दारे यांच्या मामुली व्यवस्थेत दोष उत्पन्न झाल्यास त्याचे निराकरण, दुरुस्ती लागलीच व्हावयास हवी. नवीन बंगल्यांना निरनिराळ्या किल्ल्याची नावे देता येतील.

रायगडच्या घेऱ्यात सोनगड, मानगड, चांभारगड ऊर्फ महेंद्रगड, तळेगड, घोसाळगड, बिरवाडीचा किल्ला, कुर्डू ऊर्फ विश्रामगड, चंद्रगड, मंगळगड, लिंगाणा, पाचाडचा कोट इ. किल्ले आहेत. त्यांची माहिती करून दिली पाहिजे. तेथे जाण्यास लोकांना उद्युक्त केले पाहिजे. पोटल्याचा डोंगर, वाळणकोंड, शिवथर घळ, पाचाड व रायगडवाडी, महाडजवळची पाल्याची लेणी ही ठिकाणे लोकांना सांगायला हवीत. रायगडच्या पायऱ्या सुरू होतात, तिथली तीन तोंडाची नाचणटेपाच्या डोंगरातील गुहा किंवा वाघबीळ, नाना दरवाजा व जवळील अंधारी ही गुहा, रायनाक स्मारक, गोदावरी स्मारक, रायगड प्रदक्षिणेचा मार्ग ह्या साऱ्या गोष्टी पर्यटक तेथे जाऊन पाहतील असे बघितले गेले पाहिजे. त्यासाठी योग्य तो प्रचार, योग्य त्या सोयी व्हावयास पाहिजेत.

लता–वेलींचे सौंदर्य.

रायगडावरील शिवस्मारक, वाडेश्वर ऊर्फ जगदीश्वर मंदिर, कुशावर्त ऊर्फ रामेश्वर मंदिर, शिकाई मंदिर ह्या साऱ्या परिसरात

सुंदर, रंगीबेरंगी फुलझाडे, लता-वेली झुडपे, वृक्ष आदि लावून, काही ठिकाणी सदाहरित हिरवळ निर्माण करून हा परिसर सुरंगी, सुगंधी, सुशोभित करता येईल.

पिण्याच्या पाण्यासाठी काही तलाव राखून ठेवून कुशावर्त किंवा कोलिंब तलावात तऱ्हेतऱ्हेचे कमळाचे वेल लावून त्यात बदके, मासे, कासव असे जलचर सोडून आकर्षणात भर टाकता येईल. गड परिसरातील झाडी हरप्रयत्ने राखावी, त्यात भर टाकावी व हा सारा परिसर झाडीने गच्च करावा. कालांतराने त्यात मोर, हरणे आदि निरुपद्रवी प्राणी सोडून आकर्षणात भर टाकता येईल.

गडाखालच्या भागात काही पाझर तलावही बांधता येतील. त्यामुळे झाडी वाढण्यास मदतच होईल.

दिल्ली, आग्रा, अजिंठा, वेरूळ, पुरी, मद्रास, काश्मीर आदि ठिकाणी जाणारे पर्यटक त्या ठिकाणची आठवण म्हणून अनेक गोष्टी खरेदी करतात. त्यामुळे स्थानिक जनतेला रोजगार मिळतो. वैशिष्टयपूर्ण व डोळ्यात भरण्याजोग्या गोष्टी असतील तर त्यामुळे त्या ठिकाणाची विनासायास प्रसिद्धीही होते.

छोट्या दिखाऊ पितळी तोफा, शिवरायांचे पूर्णाकृती व अर्धे असे पुतळे, पेपरवेट म्हणून वापरता येतील अशा शिवप्रतिमा व शिवमुद्रा या गोष्टी विक्रीस ठेवता येतील. काळे-पांढरे, रंगीत व त्रिमिती (थ्रीडायमेन्शनल) असे फोटो विक्रीस ठेवले तर त्याचाही खप उत्तम होईल.

शिवछत्रपतींची अस्सल चित्रे उपलब्ध आहेत. त्यांच्या हुबेहूब प्रतिकृती, त्यांचे हस्ताक्षर, त्यांची मुद्रा, नाणी, शिक्के; त्यांच्या २-३ शिल्पाकृती आहेत त्यांचे फोटो, त्यांची कुंडली, वंशावळ, त्यांच्या उत्तम पुतळ्यांची छायाचित्रे असे अनेक एकत्र छापले तर ते पुस्तक संग्राह्य बनेल. त्याला खपही चांगला असेल.

संग्रहालय.

गडाची व्यवस्था बघणाऱ्या पुराणवस्तू संशोधन खात्याकडे रायगडावर सापडलेल्या अनेक वस्तू, सर्व वास्तूचे उत्तम फोटो, काही नकाशे, शिलालेखांचे ठसे अशा गोष्टी आहेत, त्या साऱ्यांचे एखादे कायम स्वरूपाचे संग्रहालय उभारता येईल. त्यात रायगडाचा इतिहास, रायगडाची प्रतिकृती व अन्य नकाशे अशी जोड देता येईल. हे संग्रहालय ठराविक वेळी उघडे असावे. त्यासाठी काही प्रवेशमूल्यही घ्यावयास हरकत नाही. मात्र या संग्रहालयातील माहिती व सूचनादर्शक फलक आवर्जून मराठीतूनही हवेत. मग ते मराठी, हिंदी, इंग्रजी असे त्रैभाषिकही चालतील.

गडावरील शिलालेख, वास्तू, तटबंदी, मूर्ती आदिंकडे अधिक लक्ष द्यावयास हवे. त्यावस्तू व वास्तू यांचे महत्त्व अधिक ठसावे म्हणून तशा अर्थाचे फलकही तेथे लावावयास हवेत. गडयात्रिकांना तसे आवाहनही करावयास हवे. गडावर येणारे प्रवासी गंगासागरातदेखील आंघोळ, कपडे धुणे आदि कार्यक्रम करतात, यास प्रतिबंध हवा. तेथील भिंती, अन्य बांधकामे यावर खडू, कोळसे आदिंचे सहाय्याने नावे लिहितात. ते थांबावयास हवे. त्यासाठी रखवालदार ठेवून जागच्याजागी दंडही करता येतील. अशी खराबी न करण्यासाठी समाजशिक्षणाचीही गरज आहे.

या शिवदुर्गश्रेष्ठावर येणारे लोक हे शिवप्रेमी, दुर्गप्रेमी असतात. परंतु काही तरूण वा गटाने येणारी मंडळी सिगरेट-दारू पिणे, मुलींची टिंगल-टवाळी करणे, वाद्यांची बेसूर व कर्णकर्कश बडवाबडवी अशा गोष्टी करतात. परंतु सर्वसामान्यांना त्यांना थांबवता येत नाही. प्रतिबंध करता येत नाही. त्या लोकांचा बंदोबस्त करण्याची काही सोय झालीच पाहिजे.

रायगडावर येण्यास हेलिकॉप्टर सेवा, रोपवे किंवा 'केबलकार' ही आकर्षणे ठरू शकतील. भवानी कड्यावरील वाट, वाघ दरवाजाची

वाट या अवघड वाटा त्यातील साहस कायम ठेवून सुघड करता येतील.

पर्यटन संस्थांनी आपल्या सर्व उपक्रमांतून ह्या शिवतीर्थी येण्याचे आवाहन केल्यास उत्तम ठरेल.

गड मृत्तिकेची योजना.

३०० व्या शिवपुण्यतिथीचे दिवशी अनेक गड-किल्ले, धारातीर्थे व तीर्थक्षेत्रे येथील पाण्याने शिवसमाधीला अभिषेक करण्यात आला. परंतु त्यास चिरंजीवीत्त्व काही आले नाही. शिवाजी महाराजांचे वास्तव्य जेथे जेथे झाले, तेथील एकेक ओंजळ माती आणली जावी. श्री शिवसमाधीनजीक काही खड्डे खणून त्यात ही माती टाकावी. या गड-मृत्तिकेत बकुळीसारखी बहुवर्षायू व शीतल छायादायक वृक्ष संपत्ती लावावी. आंबा-चिंच आदि वृक्ष टाळावेत, म्हणजे संभाव्य दगडफेकही टाळता येईल. आत्तापासून प्रयत्न केले तर हा उपक्रम सहज करता येईल. त्या वृक्षांशेजारी तशा अर्थाचा फलक लावावा. गडमृत्तिका आणणाऱ्यांची नावे लावावीत.

या साऱ्या गोष्टी कोणी एकजण करू म्हणेल तर ते अवघड आहे. महाराष्ट्रभर पसरलेले शिवप्रेमी, धनिक, सेवाभावी संस्था व व्यक्ती शासनाची विविध खाती अशा साऱ्यांनी एकत्र येऊन परस्परसहकार्याने केल्या तर ते अधिक उचित. समर्थांच्याच्या शब्दांत थोडा फेरफार करून असे म्हणता येईल -

शिवप्रेमी तितुका मेळवावा,
महाराष्ट्र धर्म वाढवावा,
रायगड तो सजवावा, नटवावा,
सर्वांसी दाखवावा - भूमंडळी ।

रायगड : काही न उलगडलेली कोडी.

शिवतीर्थ रायगडावर आजवर अनेकदा भ्रमंती केली. गड कित्येकदा पायाखाली पालथा घातला. गडावरील अनेक वास्तू, वास्तूंचे अवशेष पाहिले. या प्रत्येक भेटीत गडावरील वास्तूंचे अवशेष आणि त्यांना देण्यात आलेली नावे याबद्दल मनात शंका डोकावत होत्या. या शंकांची समाधानकारक उत्तरे काही सापडत नव्हती. अनेक कोडी उलगडत नव्हती. रायगडचा कानाकोपरा आपण आजवर धुंडाळला, ऐतिहासिक संदर्भ तपासले, बखरीतील उल्लेखांची शहानिशा करून घेतली, इतिहासाच्या अभ्यासकांशी चर्चा केली. रायगड स्मारक मंडळातील सदस्यांशी देखील बातचित केली. गडावरील सहा महालांचे संकुल, शिवरायांचा महाल, दरबारदालन, धान्यकोठार, कैदखाना, राजवाड्याशेजारच्या मनोऱ्यानजीकचे तळघर, या आणि अशा अनेक स्थानांचे मूळ स्वरूप नेमके तेच होते की आणखी काही हा प्रश्न तर अनेक दिवस मनाला सतावत होता. रायगडासंबंधीचे ग्रांथिक उल्लेख व प्रत्यक्षातील वास्तूंची आजची रूढ नावे यातही तफावत आढळली. या साऱ्याच्या वास्तुस्थापत्य, पुरातत्त्वशास्त्र, वास्तु शिल्परचनाशास्त्र या दृष्टीने शोध घेण्याचा प्रयत्न केला.

हा शोध घेण्यासाठी मध्यंतरी सवड काढून रायगडावर काही जाणत्यांबरोबर जाऊन तब्बल आठवडाभर मुक्काम केला. श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे श्री. चांदोरकर, श्री. कुलकर्णी, श्री. गोपाळराव जोशी, श्री. गोगटे, रायगडाचा वास्तुशास्त्रीय अभ्यास करायला आलेले नागपूरचे श्री. संजय महाशब्दे, अभियंता श्री. निनाद बेडेकर, श्री. नानिवडेकर असे चार जाणतेही बरोबर होतेच. त्यामुळे यावेळी रायगडावरील मुक्कामात रात्रंदिवस रायगडासंबंधीच चर्चा होत होती. त्यातून निघणाऱ्या मुद्द्यांचे निराकरण करून घेण्यासाठी त्या शंकास्थळी सगळेजण परत परत जात

होते. पण हे सारे प्रकटपणे वाचकांपुढे ठेवले तर त्यावर उलटसुलट चर्चा होईल आणि शंकास्थलांवर अधिक प्रकाश पडेल असे वाटले म्हणून हा लेखनप्रपंच.

माल्कमसाहेबाला दुसऱ्या बाजीरावाने पेशवाईची सोडचिठ्ठी लिहून दिली. पण गड-किल्ल्यांनी भरलेला हा मुलूख ताब्यात घ्यायला इंग्रजांना चार लढाया कराव्याच लागल्या. लेफ्टनंट कर्नल प्रॉथरने १८१८ च्या मार्च-एप्रिल पासूनच या दुर्गश्रेष्ठ रायगडाकडे मोहरा वळविण्याचे ठरविले. २३ एप्रिल १८१८ रोजी रायगडाला वेढा बसला. लेफ्टनंट क्रॉसबी याने रायगडावरील शिबंदीच्या मदतीला येऊ पाहणाऱ्या कांगोरी ऊर्फ मंगळगड अन् प्रतापगडवरच्या मराठी पथकांना काळनदीकाठीच मार देऊन परतवलं.

६ मे १८१८ रोजी दुपारी चार वाजता आठ इंची (वीस सेंटीमीटर) तोफगोळा रायगडाच्या दारूकोठारावर पडला. मोठा भडका उडाला. भूकंप व्हावा तसा सारा रायगड हादरला !

मग असे आहे, तर भवानीकड्यानजीकच्या दारूकोठारच्या भिंती अजूनही शाबूत कशा? भवानी टोकाजवळील दारूकोठारांची जेवढी पडझड या कथित घटनेनंतर झाली आहे, तेवढीच पडझड टकमक टोकाजवळील दारूकोठारांची झाली आहे. या ठिकाणी मात्र असा काही स्फोट झाल्याची नोंद नाही. मुख्य म्हणजे या दोन्ही ठिकाणी दारूकोठारावरची छपरे नाहीशी झाल्याची नोंद नाही. भिंती बऱ्याच शाबुत आहेत. मग दारूकोठारावर गोळा पडून खरोखरीच स्फोट झाला किंवा कसे? याशिवाय आणखी एखादे दारूकोठार होते का? तसे उल्लेख व अवशेषही आढळत नाहीत. या गोष्टीची शहानिशा करणे स्फोटक तज्ज्ञ आणि वास्तुरचनाकारांना अशक्य नाही.

पुढे १० मे १८१८ रोजी हिंदवी स्वराज्याचा झेंडा राजधानी रायगडावरून उतरवला गेला. बिगुल आणि ट्रंपेटच्या आवाजात

युनियन जॅक वर चढला. अन् रायगडच्या अंधकारयुगाला सुरुवात झाली. त्या पट्टेरी विळख्यात रायगड जेरबंद झाला. त्यानंतर रायगड वनखात्याच्या ताब्यात गेला. तिथे सारे जंगल माजले. १८१८ च्या युद्धात इंग्रजी तोफांनी अवघा रायगड भाजून काढला. तिथल्या इमारती जाळून मोडून-तोडून टाकल्या. तक्ताची जागा - किल्ले रायगड ओस पडला. तिथे कोणीही फिरकेनासे झाले.

उपेक्षा अन् औदासिन्य.

साऱ्या गडाची काळजी घ्यायला वारा-वादळ, ऊन, पाऊस यांची फौज़ तयार होतीच. परकीय इंग्रज राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष अन् आपली उदासीनता आपापल्या परीने हातभार लावीतच होती. चार-दोन धनगर याच काळात वर चढले असावेत. त्यांच्या गाईगुरांना तिथे बक्कळ गवत अन् उदंड पाणी होते. या धनगरांच्या गाडग्या-मडक्यांच्या संसाराला राजधानी रायगडावर दोन-चार झोपड्या थाटून सुरवात झाली. आजही यातील काही मंडळींचे वंशज गडावर आहेतच. पण १८८३ पर्यंत कोणी जाणता माणूस गडावर गेल्याचा उल्लेख काही मिळत नाही. उणीपुरी ६५ वर्षे हे शिवतीर्थ एकूटवाणे राहिले होते. रायगडाशी संबंधित साऱ्या माणसांचा राबता मोडला होता. केवळ सांगोवांगी काही स्मृतिशेष न राहण्याएवढा कालावधीच उलटून गेला होता.

१८८५ मध्ये मुंबईचा गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल रायगडी आला. त्याच्यासोबत रेव्हेन्यू कमिशनर क्रॉफर्ड, कॅप्टन पिंट आदि मंडळी होती. टेंपलसाहेबाने रायगडाच्या देखाव्याची काही चित्रे पेन्सिलीने काढून नेली होती. ही चित्रे आता आपल्याला मिळवता येतील का? त्यांचा शोध कोणी घेतला आहे का? या चित्रांचे ऐतिहासिक मूल्य अपरंपार आहे. याबाबत तज्ज्ञ व शासनान एकत्रित प्रयत्न करायला नकोत का?

डग्लससाहेबाने 'बुक ऑफ बाँबे' लिहिले. श्री. गोविंद बाबाजी जोशी-वरसईकर यांनी १ जून १८८५ साली खुद्द रायगडावर जाऊन माहिती मिळवून एक पुस्तकही प्रकाशित केले. १९२६ साली याच पुस्तकाची सुधारित आवृत्तीही निघाली. यानंतरचे नाव घेण्याजोगे पुस्तक म्हणजे विष्णू वासुदेव जोशी यांचे राजधानी रायगड, ते १९२९ सालचे.

पण १८१८ ते १८९५ या काळात रायगडचा राबता संपला होता. एवढ्या कालावधीनंतर रायगडावरील स्थळनिश्चिती कशी केली असेल? कोणी केली असेल? वास्तुंना नावे देण्याचे काम केवळ तर्कावर अवलंबून होते का? ही नावे अधिकृत ठरतील का? हे सारे सांगायचे कारण रायगडावरील काही प्रमुख वास्तू व त्यांच्या नावांमुळे बरेच प्रश्न निर्माण होतात. त्यांची स्थाननिश्चिती करायला अजूनही भरपूर वाव आहे, असे वाटते. कारण त्या त्या वास्तुंची प्रचलित नावे व त्यांचे कथित वापर मनाला पटू शकत नाहीत. त्यात काहीतरी गफलत असण्याचा संभव आहे असे राहून राहून वाटते.

सहा महालांचे संकुल !

गंगासागराच्या काठावरील स्तंभांच्या बाजूला असणाऱ्या पालखी दरवाज्याने वर चढले की, उजव्या बाजूला सहा महालांचे एक संकुल आहे. त्यातील चार महाल आतून एकमेकांना जोडलेले आहेत तर दोन पूर्ण विभक्त पण एकमेकांशेजारीच आहेत.

शिवाजीमहाराजांना आठ राण्या होत्या, हे खरे पण निंबाळकरकन्या सईबाई ५ सप्टेंबर १६५९ रोजीच राजगडावर मरण पावल्या होत्या. सोयराबाई १६८१ मध्ये रायगडावर मृत्यू पावल्या. पुतळाबाई १६८० मध्ये रायगडावर सती गेल्या आणि १६८९ मध्ये इतिकदखानाने (नंतरचे नाव झुल्फिकारखान) रायगड

जिंकला, तेव्हा शिवाजी (नंतरचे नाव शाहू) व येसूबाई, यांच्याबरोबर शिवपत्नी सकवारबाईही कैद होऊन मोगलांच्या ताब्यात गेल्या. काशिबाई राज्याभिषेकाच्या थोडे आधी १६७४ मध्ये रायगडावर मृत्यू पावल्या. सगुणाबाई - लक्ष्मीबाई - गुणवंताबाई यांचं नेमकं काय झालं? त्यांचे मृत्यू रायगडावर राजधानी येण्याआधीचे की नंतरचे? हे काही ज्ञात नाही. राज्याभिषेकानंतर चार राण्यांशी (पूर्वीच्याच पत्नींशी) समंत्रक विवाह झाल्याचे उल्लेख मिळतात. म्हणजे ४ ते ७ राण्या असताना ६ च महाल कसे बांधले गेले? राजमाता जिजाऊ अन् संभाजीराजांना वेगळे महाल?

शिवाय हा तथाकथित राणीवसा अन् शिवरायांचा राहता महाल असणारा राजप्रासाद यांमध्ये नोकरचाकरांच्या राहण्याच्या जागा सलगपणे आहेत. मध्ये खंदक आहे. तो वेगळाच. म्हणजे दिवसारात्री, वेळी-अवेळी साधी कुटुंबियांची भेट घ्यायची तर नोकरचाकरांना कळल्याशिवाय ती घेता येणार नाही. हे कितपत योग्य वाटते? शिवाय या गोष्टी कुटुंबाबाहेर कोणाला कळणे हेही फारसे योग्य नाही.

या कथित राणीवशाला हवा व उजेडासाठी मागच्या बाजूला एकेक खिडकी, झरोका आहे. तेथून बाहेर डोकावले तर उत्तम देखावा दिसणे दूरच राहिले, पण शेजारच्या स्वच्छतागृहाची दुर्गंधी येण्याचीच शक्यता जास्त. यातील पहिल्या वास्तूत एकच जोते, बाकीचे पाच ठिकाणी दोन दोन जोती. पहिल्या चार वास्तूंना संडासांची संख्या प्रत्येकी आठ तर शेवटच्या दोन वास्तुंना फक्त चारच संडास का असावेत?

राण्यांना स्नानगृह, पाण्याची सोय, मोकळेपणा, सुंदर देखावे अशी कसलीच सोय उपलब्ध नाही. चारही बाजूंनी उंच भिंतीचा पहारा - जणू कायमची नजरकैदच. शिवाय हवा खाण्यासाठी बांधलेले स्तंभ/मनोरे इथून कितीतरी दूर ! तिथवर जायचे म्हणजे

परस्पर जाणे अशक्यच !

पण ही वास्तू राणीवसा कशी? हा प्रश्न सहजच मनापुढे येतो. आता यापुढचा भाग असा की हे महाल राणीवशाचे नसतील तर अन्य कोणती जागा म्हणजे राण्यांचे महाल? आणि या वास्तुंचे नेमक प्रयोजन कोणते?

शिवसिंहासन असणारे दरबारदालन आणि खाशा शिवरायांचा राहता वाडा यामध्ये सुघड दगडांचे व नेटके असे दोन प्रशस्त चौथरे आहेत. त्याजागी राणीवसा असेल तर?

तर बरेच प्रश्न सुटू शकतात. साऱ्या भोसले राजकुटुंबियांसाठी लागणारी प्रशस्त जागा, सर्वांना एकत्रित संरक्षण व गुप्तता, एकमेकांकडे जाण्यावर नसलेले निर्बंध, सुरेख दृश्य असणारे असंख्य झरोके, स्तंभ/मनोऱ्यांमध्ये सुलभपणे जाता येणे, आसपास भरपूर मोकळी जागा, स्नानगृह-शौचकूप-मोऱ्या यांचीही व्यवस्था आणि शिवराय, त्यांच्या राण्या-राजमाता-युवराज या साऱ्यांना वेगवगळ्या हवेशीर दालनात पण एकत्रित राहता येण्याजोगी सुविधा येथे उपलब्ध होऊ शकते.

आता पुढला भाग म्हणजे सध्या राणीवसा म्हणतात त्या जागी काय असू शकेल? धर्मशास्त्री व सेनापती यांचा प्रजेशी दैनंदिन संबंध कितपत येणार? तेव्हा उरलेल्या सहा प्रधानांची कार्यालये, त्यांचे महत्त्वाचे कागदपत्र यांची सोय राजवाड्यानजीक पण तेथील रहदारीने उपद्रव न होईल अशी. मेणा व पालखी दरवाज्यावरील कडक पहाऱ्यांतून येणाऱ्या प्रजेला येथील महत्त्वाची कामे उरकण्यासाठीची कार्यालये असतील तर त्यांच्यासाठी शौचकूपांची जादा संख्या पुरेशी वाटते. मात्र त्या काळी कोणीही उठावे अन् थेट अष्टप्रधानांकडे जाऊन गराडा घालून बसावे असे होत नसणार. रत्नशाळा, जामदारखाना याप्रमाणेच ही दप्तरे व प्रधानांची कार्यालये बंदोबस्तात व बालेकिल्ल्यावरच असणार.

हे सारे अधिक तर्कसुसंगत वाटते. मात्र तथाकथित राणीवशांच्या व संभाव्य प्रधानांच्या कार्यशालांच्या जागी असणाऱ्या लाखो विटा गेल्या कुठे ? की त्यांचाच उपयोग करून विभाजक भिंती नंतरच्या काळात बांधल्या गेल्या व तिथे कैदी ठेवायला त्यांचे रूपांतर तुरूंगासारख्या जागेत केले गेले ? मोगली अंमल - हबशी राजवट - पेशवाई या काळात असे काही प्रतिष्ठित कैदी गडावर होते. इंग्रजांच्या काळातही सवाई माधवरावांची द्वितीय पत्नी यशोदाबाई या गडावरच कैदेत होती.

धान्य कोठार व कैदखाना ?

शिवरायांचे निवासस्थान, प्रधानांचे वाडे आणि प्रधानांची संभाव्य कार्यालये ऊर्फ सध्याचा तथाकथित राणीवसा यांच्याबरोबर मध्यभागी स्वतंत्र्य जोत्यावर एकाशेजारी एक बांधलेल्या तीन खोल्या आहेत. पैकी फक्त एकीला दार आहे. मात्र तीनही खोल्यांना वरून दगडाच्या तोंडी लावून बंद करण्याची सोय आहे. ही व्यवस्था धान्य साठविण्याच्या जागेची असावी. कायम लागणारे धान्य दार असलेल्या खोलीत आणि उरलेल्या कोठ्यांमध्ये जादा धान्यसाठा केला जाणे संयुक्तिक व शक्य कोटीतील वाटते.

काहीजणांच्या मते या अंधारकोठड्या असाव्यात. परंतु हे शक्य वाटत नाही कारण येथे ठेवलेल्या माणसाचा नुसता आरडाओरडा, मलमूत्रविसर्जनाची काहीच सोय नसल्याने त्याचा कुबट वास यामुळे राजकुटुंब व प्रधानांना त्रास तर होईलच पण त्या घोर अपराध्याने काही फितवा केला व तो सुटलाच, तर केवळ काही पावलांवर राजवाडा किंवा प्रधानांचे वाडे असणे हे नसत्या गोष्टीला वाव देण्यासारखे होईल. हा धोका शिवराय पत्करतील असे वाटत नाही. अशी अंधारकोठडीची सोय करायला रायगडाच्या विस्तीर्ण पठारी माथ्यावर भरपूर जागा आहे.

रत्नशाळा की खलबतखाना ?

गंगासागराच्या काठावर असणारे दोन मनोरे अन् राजवाड्याशेजारचा वरचा मनोरा यांच्या निकट एक तळघर आहे. त्या तळघराच्या माथ्यावर असणारी खोली जाडजूड दगडी भिंतीची आहे. या जागी खलबतखाना होता असे सांगितले जाते. परंतु ती जागा अतिशय कोंदट-कुबट व अंधाराची आहे, भरपूर उजेडाशिवाय तेथे वावरणे अशक्य आहे, परंतु मशालींच्या उजेडात तेथे तासन्तास खलबते करीत राहिले तर गुदमरून जाण्याचा संभव आहे. तसेच तेथे मुळातच उबदार असणारे वातावरण धुरकटून अधिक गरम होऊन त्रासही होईल.

राजवाड्यालगत असणाऱ्या ह्या तळघराची रचना मूल्यवान दागदागिने, जडजवाहीर, पैसे ठेवण्यासाठी वापरली जाणे सहज शक्य आहे. तेथे असणारे कोनाडे अशा संदुका ठेवण्यासाठी वापरले जात असावेत. महाराजांना सर्व गडावर कोठेही पाहिजे तो एकांत निर्माण करणे फारसे अवघड नाही. त्यासाठी अशा तळघराची आवश्यकता वाटत नाही.

राजरस्त्यावरील नगरपेठ ?

होळीच्या माळावरून वाडेश्वर ऊर्फ जगदीश्वराकडे जाऊ लागले की दोन अडीचशे मीटर लांब (सात-आठशे फूट लांब) व बारा-तेरा मीटर रुंद (४० फूट रुंद) असा सरळ रस्ता आहे. त्याच्या दुतर्फा तीन तीन खोल्यांचे एक अशी त्रेचाळीस जोती आहेत. पहिल्या चौदा घरांनंतर दोन्ही बाजूला जाण्यासाठी बोळ सोडले आहेत. नंतर डाव्या बाजूस सात किंवा साडेसात व उजव्या बाजूस आठ अशी घरे आहेत. ही घरे सर्वसाधारणपणे सारखी, एकाच लांबी-रूंदीची व समान जोत्यावर आहेत. राजरस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या या पेठेला सध्या बाजारपेठ हे

नाव दिलेले आहे.

ही दुकाने कशावरून? एवढ्या त्रेचाळीस दुकानांचे तेथे कोणते प्रयोजन असेल? ही दुकाने कशाची असतील? हे सारे प्रश्न साहजिकच मनात येतात. जर ही बाजारपेठ असेलच तर त्याचे उल्लेख मिळतात का? याचाही शोध घ्यायला हवा.

वि.वा. जोशी यांच्या १९२९ मधील पुस्तकात येथे केलेल्या उत्खननात जाती, लामण दिवे, ठाणवया अन् देवादिकांच्या मूर्ती सापडल्या असे उल्लेख आहेत. दुकानांच्या जागी अशा वस्तू सापडतील का?

वाडेश्वर ऊर्फ जगदीश्वराच्या नगारखान्यावरील लेखात रायगडची उभारणी करताना त्या शिवमंदिराबरोबरच विहीरी, आड, अनेक तलाव, रम्य वने, रस्ते, स्तंभ, गजशाळा, राजवाडे असं सारे साग्रसंगीत उल्लेख करताना एकमेवाद्वितीयम अशा बाजारपेठेचा उल्लेख हिरोजीने कसा टाळला असता?

शिवाय हेन्री ऑक्झेडन, उस्टीक, टॉमस निकल्स अशा अनेक सूक्ष्मलक्षी परकीय प्रवाशांच्या लिखाणात इतक्या भव्य व अद्वितीय बाजारपेठेचे उल्लेख कसे सापडले नाहीत?

पेठेतील प्रत्येक घराला मध्यभागी ५ पायऱ्या आहेत. तेथील बांधकामावरून या ठिकाणी दरवाजे असण्याच्या खुणा दिसत नाहीत. तर हा घराचा पडवी/ओटी सारखा उघडा भाग वाटतो.

राजकुटुंब व प्रधानांचे वाडे गृहीत धरले तरी दुय्यम अधिकारी, टांकसाळप्रमुख, शस्त्रागार प्रमुख, नौदलाचे प्रमुख, स्थपती हिरोजी इंदुलकर, बाळाजी आवजी चिटणीस, रायगडावरील १८ कारखान्यांचे प्रमुख, रायगडाच्या बागबगिच्यांची काळजी घेणारा उद्यानधिकारी, कविराज भूषण, कविंद्र परमानंद, अशा अनेक प्रतिष्ठितांचे रायगडावरील वास्तव्य मुख्य वस्ती सोडून दूर कानाकोपऱ्यात असेल की राजवाडा, प्रधानवाडे, प्रमुख कार्यालये, दरबार दालन ऊर्फ राजसभा याच्या

जवळपास असेल ? हा विचारही ध्यानी घ्यायला हवा. या घरांच्या उंच जोत्यांवरून कोणीतरी डोकं लढवलं की घोड्यावरून बसल्या बसल्या खरेदी करता यावी म्हणून ती जोती उंच. पण अशी खरेदी करण्यामागे कामाची असणारी घाई की घोड्यावरून खाली उतरायचा आळशीपणा ? शिवकालात तर दोन्हीला थारा नव्हता ! रायगडावरील इतर सर्व राहत्या घरांची जोतीही अशीच उंच आहेत हेही विसरून चालणार नाही.

ही दुकाने असतील तरीही एकेका दुकानात मालक व एक-दोन नोकर असणारच. म्हणजे आदमासे दीडशे जणांसाठी स्वच्छतागृहांची सोय लागणारच. तशी ती सध्या नाही. ही घरे मानली तर तेथील रहिवाशांची संख्या तीनशेच्या आसपास जाईल. एवढाच संख्यात्मक फरक पडेल.

राजगडावर म्हणजे आधीच्या राजधानीच्या जागी तर खाशांचा महाल सोडला तर अन्य कोणत्याही वास्तूला लागून शौचकूप नाहीत. रायगडावर राजवाड्यात व प्रधानांच्या वाड्यांना फक्त जोडलेले शौचकूप आहेत. उत्तरेतल्या लाल किंवा संगमरवरी किल्ल्यांतील वास्तूंनाही अशी अटॅचड् टॉयलेटची सोय नाही. हेही ध्यानी घ्यायला हवं.

बाजारपेठेच्या बांधकामासाठी प्रचंड वेळ, श्रम व पैसा घालविणे प्रयोजक वाटत नाही. पण राजधानीवरील प्रतिष्ठित मंडळींच्या निवासस्थानांसाठी असा खर्च करणे शक्य वाटते.

वरील सर्व विवेचनावरून ही बाजारपेठ नसून राजधानी रायगडावरील महत्त्वाच्या व्यक्तिंची निवासस्थाने असणारी नगरपेठच असावी असे वाटते.

वाघ्या कुत्रा कल्पनेतला ?

शिवरायांचे दहन जिथे झाले तेथे उचित स्मारक उभे

राहिले असेलसुद्धा. दहनाची नेमकी जागा व तेथील वृंदावन, छत्री, स्मारक यांच्यासंबंधीचे उल्लेख मात्र मिळत नाहीत, हेच खरे. काहीही असले तरी तेथील चौथऱ्यावर नवी टुमदार छत्री उभारण्याची कल्पना पुढे आली. तेव्हा बांधकाम करताना श्री. सुळे या कॉंट्रॅक्टरना १९२५-२६ साली दगडी पेटीसारखे बांधकाम व सात अस्थी व रक्षा मिळाल्याचे नमूद आहे. पाचाडचे श्री. तुकशेट शेडगे हे त्या वेळी प्रत्यक्ष उपस्थित होते. त्यांच्या आठवणीही ऐकण्यासारख्या आहेत. ती राख तीन शिशाच्या पेट्यांमध्ये भरली. दोन पेट्या सध्याच्या शिवस्मारकाच्या तळाशी पूर्वीच्या जागी ठेवल्या गेल्या आणि एक पेटी कलकत्त्याच्या 'झूलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया' च्या कार्यालयात परिक्षणासाठी पाठविली गेली. त्यांच्या परिक्षणावरून दोन-अडीचशे वर्षापूर्वीची पुरुषाची अग्निसंस्कार झालेली हाडे त्यात सापडली.

याशिवाय त्यामध्ये बाऊल म्हणजे उदमांजर या प्राण्याची अग्निसंस्कार न झालेली हाडे आढळली. पण मूळ रिपोर्टमध्ये कुत्र्याची हाडे सापडल्याचा कोठेही उल्लेख नाही.

बहुधा चिरे उखडलेल्या त्या चौथऱ्यातील फटीतून हा प्राणी तेथवर गेला व आत अडकून मरण पावला असावा. हा सर्व शास्त्रीय परिक्षणाचा अहवाल प्रसिद्ध झालेला आहे. मात्र त्या वेळचे तपासून उरलेले अवशेष आजमितीस कोठे आहेत, याचा पत्ता लागत नाही.

अर्थात या गोष्टीमुळेच वाघ्या कुत्र्याच्या घटनेला कोणताही पुरावा मिळत नाही, हे निर्विवाद आहे. तत्कालीन कागदपत्रांत किंवा बखरीमध्येही अशी कोणतीही घटना घडल्याचे आढळत नाही.

शिवस्मारकाची चळवळ लोकमान्य टिळकांनी सुरू केली. अनेक थोरामोठ्यांचे व जनसामान्यांचे हातभार त्या निधीसाठी

लागले. इंग्रजांच्या सुरक्षित छत्राखाली लाचार बनलेल्या संस्थानिकांना इच्छा असूनही या शिवस्मारकाला मदत करणे शक्य होत नव्हते. श्री. तुकोजीराव होळकरांनी गडकऱ्यांच्या राजसंन्यास नाटकाचा आधार घेऊन वाघ्या कुत्र्याच्या स्मारकाला पाच हजार रूपयांची ठसठशीत देणगी दिली. शिवदहनस्थानाच्या चौथऱ्याजवळच एक आणखी चौथरा होता. तेथे हे स्मारक उभारले गेले.

हे स्मारक शिवछत्रपतींचे जोडे उराशी कवटाळून सती गेलेल्या श्रीमंत पुतळाबाईसाहेबांचे तर नसेल ना? तथाकथित वाघ्या कुत्र्याने चितेत उडी मारली असतीच तरी त्याचे वेगळे स्मारक उभारले गेल्याचा ना पुरावा, ना तशी प्रथा. पण त्याच ठिकाणासमोर शिवपत्नी सती गेली तर त्यांचे वृंदावर उभारले जाणे शक्य वाटते.

वाघ्या कुत्र्याच्या स्मारकाला पुरावा नाही. पण शिवस्मारकाला मदत करण्याच्या उद्देशाने एका धनिक संस्थानिकाने एका नाटकाच्या आधारे पैसे दिले. कारण शिवस्मारकाच्या छत्रीला खर्च आला एकोणीस हजार रूपये आणि कुत्र्याच्या स्मारकाला आला पाच हजार हे शक्य वाटत नाही. वाईट एवढेच वाटते की त्यामुळे पुतळाबाईंचे स्मारक मात्र नाहिसे तर झाले नाही ना?

उत्खननातील पुरावे.

१९७४ साली शिवरायांच्या राज्यारोहण त्रिशतसंवत्सरी उत्सवामुळे रायगडावरील अवशेषांमध्ये उत्खनन-संशोधन व स्वच्छतेला प्रारंभ झाला. त्यामध्ये असंख्य गोष्टी सापडल्या. त्यांच्या नेमक्या जागा कळल्या तर काही वास्तुंची स्थाननिश्चिती अधिक ठामपणे करता येईल. मोर्तब सुद शिक्का, हा शिक्का सापडला, चिनी लिपीत 'सप्रेम भेट' असा मजकूर लिहिलेल्या चिनीमातीच्या बशा-वाडगे सापडले. ते कोठे सापडले हे कळले तरीही बराच

उपयोग होऊ शकेल. त्याचा अहवाल पुरातत्त्व खाते जनतेसमोर आणेल का ? त्यामुळे काही निश्चित कल्पना येऊ शकेल.

शिवरायांचे वास्तव्य असणाऱ्या जागेतील विटा कोठे गेल्या ? गंगासागरातील मनोऱ्यांच्या शेजारी असणाऱ्या व शौचकूपासारख्या दिसणाऱ्या जागी नेमके काय असावे ? कारण तो शौचकूप असेल तर त्या ठिकाणी मल वाहून जाण्याची काहीच सोय नाही. ती पाणी गरम करण्याची चुलाणे तर नसतील ना ? स्तंभ म्हणजे मनोरे यामध्ये मिळणारे नळ व कारंज्याच्या सोयी पाहता या ठिकाणी पाणी कोठून येत असेल ? मदारी मेहतरच्या स्मारकाशेजारील लोखंडी खांब व त्याच्या माथ्यावर असणाऱ्या कडीचे प्रयोजन काय ? त्यावरील लेखाचा अर्थ काय ? होळीच्या माळावर बसविलेल्या शिवपुतळ्यामागील खडकाच्या बुडाशी खोदीव चौकोनी जागा कशाला ? राजदरबारातील पूर्वेकडचा खडक न फोडता तसाच का ठेवला गेला ? भवानी कड्यावरची चोरवाट, विशिष्ट ठेवणीच्या खोदीव चौकोनी गुहा असे आणखीही काही प्रश्न अनुत्तरितच राहतात.

ध्वनिचमत्काराचे कोडे.

सध्या मेघडंबरी बसविलेल्या सिंहासनाच्या चौथऱ्याशी हळू आवाजात बोलले, साधा कागद फाडला किंवा काड्याच्या पेटीवर काडी घासली तरी राजसभेत हा आवाज सर्व ठिकाणी स्पष्ट ऐकू जातो. राजसभेत कोठेही उभे राहून साधी कुजबूज केली तरीही ती सिंहासन चौथऱ्याशी स्पष्ट ऐकू जाते. ३०० वर्षांपूर्वी साधलेला हा ध्वनिचमत्कार कसा घडविला गेला ? हे कोडे काही नीटसे उलगडले नव्हते.

सिंहासनाच्या जागेभोवती एका दालनाभोवती भिंती घालून तयार केले आहे. त्याला चारही बाजूंनी खिडक्या आहेत. पण मागच्या बाजूच्या खिडक्या सिंहासन चौथऱ्याच्या खालच्या पातळीवर

आहेत. त्यामुळे ध्वनिलहरी बाहेर जाण्यास पुढच्या बाजूस (म्हणजेच भव्य दरबार दालनातच) वाव आहे. त्या बाजूस असणाऱ्या असंख्य खिडक्यांमुळे ह्या ध्वनिलहरी दरबारभर जाऊ शकतात. परंतु नेमके खिडकीखाली किंवा दोन खिडक्यांमध्ये पण भिंतीजवळ उभे राहिले तर जवळ असूनही आवाज ऐकू येत नाही. ह्या खिडक्यांची जागा-संख्या-पातळी बदलली गेली तरीही ध्वनिसाधन नाहीसे होईल किंवा सिंहासन चौथऱ्यामागील भिंत पडली तरीही ह्या आवाजास बाधा येईल.

रायगड प्रकल्प.

रायगडावर लोकमान्य टिळकांनी पहिला शिवोत्सव केला. तो दिवस होता २५ एप्रिल १८९६. म्हणजे अजून तीन वर्षांनी घटनेचा शताब्दि समारोह आहे. पुरातत्त्व खाते, महाराष्ट्र शासन, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, भारत इतिहास संशोधक मंडळ, महाराष्ट्रातील नामवंत शिवप्रेमी व दुर्गप्रेमी व्यक्ति, मंडळे, यांनी पुढाकार घेऊन रायगडावर काही सुधारणा, आकर्षण केंद्रे, संग्रहालय आदि सोयी उपलब्ध करून द्यायला हव्यात. रायगड परिसराचा ट्रेकर्सचे नंदनवन म्हणून विकास व्हायला हवा. 'रायगड प्रकल्प' तयार करून त्याला कालमर्यादा घालून तो राबवायला हवा. त्यासाठी हा शताब्दि महोत्सव हे फक्त निमित्त.

१३. किल्ले लिंगाणा : (जि. रायगड)

महाराष्ट्राचं हे मॅटर हॉर्न !

युरोपखंडात मॅटर हॉर्न हे एक अवघड शिखर, आल्प्स् पर्वतराजीतील एक आव्हान. त्यावर जाण्यास अनेक मोहिमा प्रत्यही निघत असतात. मॅटर हॉर्नवर काही चित्रपट, कादंबऱ्या, माहिती

पुस्तके, प्रवासी पुस्तिका असे बरेच काही उपलब्ध आहे. पण महाराष्ट्राचे हे मॅटर हॉर्न अजूनही उपेक्षितच आहे.

शिवलिंगासारखा आकार असणारा म्हणून लिंगाणा. रायगड ही हिंदवी स्वराज्याची राजधानी. ते राजगृह तर लिंगाणा हे कारागृह. लिंगाणाच्या सुळक्यात असणाऱ्या गुहांमध्ये मृत्युदंडाची शिक्षा झालेले कैदी ठेवले जात असत. गुहेत ठेवताना वापरलेले दोर आणि शिड्या काढून घेतले की त्या बेईमानी गुन्हेगारांना 'मरण्याचे स्वातंत्र्य' मिळत असे. या गुहेतून बाहेर पडण्यासाठी केलेल्या धडपडीतून खाली पडून येणारा मृत्यू, नाहीतर त्या निर्जन-निर्जल गुहेत अन्नपाण्याविना तडफडून मृत्यू ! नऊशे-साडेनऊशे मीटर उंचीचा माथा असणारा हा सुळका गुन्हेगारांना कर्दनकाळ वाटत असल्यास नवल नाही.

बोराड्याच्या नाळेशेजारी, रायलिंग टोकानजीक असणारा हा किल्ला गाठायला लिंगाणा माची गावात जावे लागते. तेथून अवघ्या २५० चौरस मीटर क्षेत्रफळाचे तटबंदिस्त आवार म्हणजे हा लिंगाणा किल्ला. हणमंत बुरूज, पहाऱ्याचा बुरूज, सरकारवाडा, प्रवेशद्वार असे काही स्थळवाचक उल्लेख कागदपत्रांत मिळतात, पण त्यांची आज ओळख पटवणे महाकर्मकठीण झाले आहे.

गडावर पूर्वी सोमजाई व जननी देवी पूजिली जात असे. सध्या त्या तेथून उचलून खाली नेल्याने लिंगाणा माचीतच स्थिरावल्या आहेत. लिंगाणा माचीतून गडमाथ्यावर जाताना वाटेत पहाऱ्याची चौकी आहे. ढासळलेल्या पायऱ्या, उंबराचे झाड, मुरमाड घसरडी अन् गवताळ निसरडी वाट या अडचणींना तोंड देत आपण सदरेवर किंवा प्रशस्त गुहेत जातो. तिला चार खिडक्या व प्रवेशद्वार आहे. शेजारी आहे धान्यकोठार. या किल्ल्याच्या जिभेसारख्या लांब-जिभी पहाऱ्यावर जननी देवी व सोमजाई देवीची मूळ स्थाने आहेत. पाण्याचे हौद व काही भग्नावशेषही आहेत.

लिंगाण्याच्या कारागृहात पाहुणचार घेतलेल्या काही बड्या मंडळींची नावेही कागदपत्रात आढळतात ती अशी - १७७५ ते ७६ - गोपाळशेट सोनार, १७८३ - मानसिंग खलाटे, १७७९-८१ गणेशभट परांजपे (मोरोबादादांच्या पक्षातील), १७८५ मध्ये मोरोजी नाईक संपकाळ, १७९५ मध्ये मेस्तर जमा फरसिसीण, १७९५-९६ ठकी कोंडूरकरीण अशी ही नावे. मनुष्यवध, राजकीय गुन्हे अशा भयंकर गुन्हेगारांना येथे ठेवीत असत. लिंगाण्याच्या घेऱ्यात वाळणखुर्द, पणदरी, दापोली, पाने ही गावे मोडत असत.

पोतनीसांकडून रायगड पेशव्यांकडे आला तेव्हा लिंगाण्यावर दोन तोफा व दोन जंबुरे असल्याची नोंद मिळते. तर रायगडावर ४६ तोफा, ३२ बंदुका, ३२ जेजाला व ३ जंबुरे असल्याची नोंद आहे. पेशव्यांमार्फत हंसाजी खैरा याला रायगडचा किल्लेदार केले गेले, तर संभाजी दौंड, चिमणाजी गोविंद व खंडोजी शेळके यांना लिंगाण्याची व्यवस्था सांगितली गेली. धोंडो नारायण मोने हे कारकून म्हणून त्यांना मदत करीत असत. त्यावेळी १२ खंडी भात आणि १९ खंडी नागली गडावर होती अशी नोंद मिळते. रोख खजिना मिळाल्याचे दिसत नाही. पुढे देवजी गोपाळला लिंगाण्याची सबनिशी सांगितल्याचे आढळते. १७९५ मध्ये बाळकृष्ण हवालदार म्हणून काम करू लागले. १८१३-१४ मध्ये लिंगाण्याचा वार्षिक खर्च ३१५०॥ रुपये होता. १७७३-७४ मध्ये संताजी बिन नागोजी शेलार गडाचा सरनौबत होता. तर १७८०-८१ मध्ये येसाजी नाईक चांदळेकर हवालदार व गणोजी नाईक सरनौबत होते. त्यावेळी महादजी निळाजी व रामजी नारायण हे सबनिशी करीत होते. १७८६-८७ मध्ये रंभाजी दौंड हवालदार होते. पण कामात चूक झाल्याने त्यांच्याऐवजी बाळकृष्ण पांडुरंगांची नेमणूक झाली.

लिंगाणा किल्ल्याचा सुळका हे गिर्यारोहकांना असणारे आव्हान.

जयंत नाखवा, उषा भिडे अशा कसलेल्या गिर्यारोहकांनादेखील यश हुलकावण्या देत होते. पण २५ डिसेंबर १९७८ रोजी दुपारी बारा वाजता तु. वि. जाधव, हिरा पंडित, अनिल पटवर्धन, संतोष गुजर, अजित गोखले, विवेक गोऱ्हे, एस.के. मूर्ती, विलास जोशी, नंदू भावे, शाम जांबोटकर, श्रीकांत फणसळकर, विनय दवे, संदीप तळपदे, किरण समर्थ अशा चौदा तरूणांनी लिंगाण्याचा माथा गाठण्यात यश मिळविले. त्यानंतर दीड-दोनशे तरूण-तरुणींनी तेथे पदन्यास करण्यात यश मिळविले.

१४. पाचाडचा कोट : (जि. रायगड)

जिजामाता या खऱ्या महाराष्ट्रकन्या. विदर्भातल्या सिंदखेडराजा इथल्या लखुजी जाधवरावांच्या या कन्येचे सासर होते, मराठवाड्यातल्या वेरूळच्या भोसल्यांकडे. आयुष्याचा मोठा कालखंड पश्चिम महाराष्ट्रातल्या पुणे - सिंहगड - शिवापूर - राजगड या भागात व्यतीत केल्यावर सरत्या वयात - आयुष्याच्या अखेरच्या कालखंडात जिजामातांचा पुत्र शिवबा कोकणातल्या रायगडी राहू लागला. पण ती थंड हवा जिजामातांना मानवेना. मग त्यांनी गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या पाचाड गावी एक कोट बांधला. सुमारे एक हेक्टर क्षेत्रफळाच्या या कोटाचे महाद्वार आहे पूर्वाभिमुख. त्यात उभे राहिले की रायगडाचे दर्शन होते. या गढीच्या महाद्वाराच्या दोन्ही अंगास दोन बुरूज आहेत. आत प्रवेशले की रखवालदाराची चौकी, कोटप्रमुखाचा वाडा, सबनीसांचा घरटा, तलाव, शस्त्रागार, अनेक घरट्यांची जोती असे खूप पाहण्यासारखं आहे. ६० मीटर लांब अन् १२ मीटर रुंदीचं जोतं आहे. तो आऊसाहेबांचा वाडा. तीन दालनं अन् दुपाखी व दुमजली इमारतीचा उत्तरभाग

मुदपकखान्याचा, मधला भाग भेटीगाठीचा तर दक्षिणभाग जिजामातांच्या वास्तव्याचा असावा.

या वाड्याला लागून दोन षटकोनी चौथरे आहेत. रायगडावरील गंगासागराच्या काठावरील मनोऱ्यांसारखेच इथेही मनोरे असावेत. कोटामध्येच एक रेखीव बांधणीची व पायऱ्यांची विहीर आहे. हिला लोडबाव किंवा तक्त्याची विहीर म्हणतात.

१८ जून १६७४ म्हणजे ज्येष्ठ शु. ९ शके १५९६ रोजी शिवरायांच्या राज्याभिषेकानंतर, अवघ्या अकरा दिवसांनी पाचाडच्या कोटात जिजामातांचा मृत्यू झाला. छत्रपतींवरचे मायेचे छत्र दूर झाले. पाचाडचा कोट रायगडच्या सुखदुःखाचा जोडीदार अन् साक्षीदार आहे. ३ नोव्हेंबर १६८९ रोजी रायगड पडला. रायगडचा इस्लामगड झाला. पाचाडचा कोट, मशीर मोर्चा, रायगडवाडी हा सारा भाग मोगलांच्या ताब्यात आला शंभूपुत्र शिवाजी पुढे शाहू झाला. मोगलांनी रायगड व पाचाडचा ताबा जंजीरेकर सिद्दीकडे दिला. पुढे ५ जून १७३३ रोजी रायगडचा ताबा मिळाला, पण पाचाडचा कोट हाती यायला १० जानेवारी १७३४ उजाडला. यावेळच्या चकमकीत सिद्दी अंबर मारला गेला. पोतनीसांकडून अप्पाजी हरी या नारायणराव पेशव्यांच्या सरदाराने रायगड जिंकून घेतला. तेव्हाच पाचाडची ही गढीही पेशव्यांकडे आली.

पण पुढे नारायणराव पेशव्यांच्या आज्ञेनेच पाचाडचा कोट मोडून टाकला गेला. पाचाड ते कोंझर पायवाटेवर एक टेकडीवजा उंचवटा आहे त्याला सावंतांचे मेट म्हणतात. सुरमाळ्यावर ही जागा आहे. पाचाडचा कोट व सावंतांच्या मेटामध्ये दुंदुभीचा बुरूज आहे. तेथून इशारतीचे कर्णे, नगारे आदी वाजवीत असत. पाचाडच्या कोटाबाहेर सोमजाईचे मंदिर आहे.

पाचाडच्या कोटात मराठी वैभवाचे, शिवकालाचे संग्रहालयस्वरूपी स्मारक होणे सोयीचे पडेल व या वास्तूची

बूजही राखली जाईल. पाचाडच्या कोटाजवळ १५-२० मिनिटांच्या चालीवर राजमाता जिजाऊसाहेबांचे वृंदावन ओढ्याचे काठी आहे. तो सारा परिसर आता देखणा बनला आहे, तो तिथं फुलवलेल्या उपवनांमुळे.

खरं तर 'रायगड-पाचाड' या परिसराचा विकास करण्यासंबंधीचा एक मास्टर प्लॅन तयार करायला हवा आणि तो प्रामाणिकपणे राबवायला हवा असो.